cmyk

# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७० | गुरूवार, दि.१६ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मतदार यादीतील घोळ आघाडीसाठी धोकादायकच

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे.

# अतिवृष्टीबाधितांना ४८० कोटी रुपयांच्या निधी वाटपास मान्यता

## शासन निर्णय जारी, शेतकऱ्यांना मदतीचा ओघ सुरू होणार

पुणे । प्रतिनिधी

**राज्य सरकारने ऑगस्ट ते सप्टेंबर २०२५ च्या दरम्यान झालेल्या शेतीपिकांसाठी ४०६ कोटी ५० लाख ३७ हजार रुपयांच्या वितरणास मंजुरी दिली आहे. यामध्ये अकोला, बुलढाणा, वाशीम, जालना आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश आहे. याबाबतचा शासन निर्णय बुधवारी (दि.१५) जारी करण्यात आला आहे. यामध्ये अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निविष्ठा अनुदान स्वरूपात २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार मदत देण्यात येणार असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.**

अकोला जिल्ह्यासाठी ऑगस्टमधील नुकसानीपोटी १ लाख २० हजार ४६६ शेतकऱ्यांना ९१ कोटी १२ लाख ५८ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



यामध्ये बाधित क्षेत्र १०६५७६.८६ हेक्टर इतके आहे. तर बुलढाणा जिल्ह्यातील

### २०२३ चा शासन निर्णय बाधक ठरणार

वास्तविक आजच्या शासन निर्णयात राज्य सरकारने २०२३ च्या शासन निर्णयाची पाचर मारली आहे. त्यामुळे एनडीआरएफच्या निकषांनुसार ३३ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दोन हेक्टरच्या मर्यादेत देण्यात येणार आहे. कोरडवाहूसाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायतसाठी १७ हजार रुपये आणि बहुवार्षिक पिकांसाठी २२ हजार ५०० रुपये द्यावी असे मार्च २०२३ च्या शासन निर्णयात दर निश्चित करण्यात आले आहेत. याच निकष आणि दरानुसार आता ४८० कोटी रुपयांची मदत वितरीत केली जाणार आहे.

सप्टेंबर महिन्याच्या नुकसानीपोटी २८९ कोटी २७ लाख २८ हजार रुपयांच्या वितरणास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये ४ लाख ४ हजार ९०८ शेतकऱ्यांचं ३३३६९३.७७ हेक्टरवरील क्षेत्र बाधित आहे. तर वाशीम जिल्ह्यासाठी सप्टेंबर महिन्यात झालेल्या ४० हजार ५४५ शेतकऱ्यांच्या ४०७४८.८५ हेक्टरवरील नुकसानीसाठी ३४ कोटी ६४ लाख ८४ हजार रुपयांच्या वाटपास मंजुरी देण्यात आली आहे.

▶▶ पान २ वर

### काही ठिकाणचे पंचनामे अद्यापही रखडलेलेच

अभूतपूर्व नुकसान होऊन अद्यापही पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. काही ठिकाणी पंचनामे रखडले आहेत. त्यामुळे राज्य सरकार ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याचे छाती फुगवत सांगत असले तरी प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळणार आहे. राज्य सरकारने मदतीची शेखी मिरवली तरी प्रत्यक्षात मात्र राज्य सरकारने शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग केल्याचे वास्तव आहे.

## थोडक्यात...

### महाभारत'च्या कर्णाचा अस्त



मुंबई : प्रसिद्ध चित्रपट आणि टीव्ही अभिनेते पंकज धीर यांनी वयाच्या ६८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. बी.आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' मालिकेत त्यांनी कर्णाची भूमिका साकारली होती, ज्यामुळे ते घराघरात लोकप्रिय झाले होते. ते बऱ्याच काळापासून ते कर्करोगाशी झुंज देत होते. पंकज धीर यांचा मुलगा निकितन धीर आणि सून कृतिका सेंगर हे दोघेही कलाकार आहेत. 'चंद्रकांता' या मालिकेत त्यांच्या 'शिवदत्त' या भूमिकेचीही खूप प्रशंसा झाली.'बढो बहू', 'युग', 'द ग्रेट मराठा' आणि 'अजूनी' यांसारख्या मालिकेतही त्यांनी काम केले होते. याशिवाय, 'सोल्जर', 'तुमको ना भूल पाएंगे', 'रिश्ते', 'अंदाज', 'सड़क' आणि 'बादशाह' यांसारख्या बॉलिवूड चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका साकारल्या होत्या.

### भारताचा जीडीपी वाढणार

वॉशिंग्टन: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के कर लादला आहे. अमेरिकेच्या या धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसण्याची शक्यता होती. मात्र या कराचा कोणताही परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपी वाढणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. आयएमएफने जीडीपी ०.२ टक्क्यांनी वाढून तो ६.६ % असेल असे म्हटले आहे. आयएमएफच्या अंदाजामुळे अमेरिकेचा डाव फसला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार भारताचा जीडीपी एप्रिल–जून या पहिल्या तिमाहीत अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने म्हणजे ७.८ % वाढला. देशांतर्गत व्यापार मजबूत झाल्याने हा वेग जास्त राहिला. यामुळे अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादला तरी भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था होती. याचाच अर्थ अमेरिकेच्या निर्णयाचा कोणताही परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला नाही. उलट भारताचा विकासदर वाढला आहे.

### वांगचुक यांचा कारागृहातील मुक्काम वाढला!

दिल्ली : ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या सुटकेसाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी बुधवारी (१५ ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयाने २९ ऑक्टोबरपर्यंत तहकूब केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी २ ऑक्टोबर रोजी संविधानातील कलम ३२ अंतर्गत 'हॅबियस कॉर्पस' (बंदी प्रत्यक्षीकरण) याचिका दाखल केली होती. या याचिकेत त्यांनी पतीला राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत झालेल्या अटकेला आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सिब्बल यांनी सांगितले की, वांगचुक यांना त्यांचे नोट्स त्यांच्या पत्नीला (वकिलांना देण्यासाठी) देण्याची परवानगी मिळाली नव्हती. ''नजरकैदेबद्दल त्यांनी काही नोट्स तयार केले आहेत. त्या त्यांना त्यांच्या पत्नीच्या वकिलांना द्यायचे होते. त्यांनी तयार केलेले कोणतेही नोट्स देण्यास ते पात्र आहेत, वकिलांची मदत घेण्याचा त्यांचा अधिकार आहे. नोट्स दिले जावेत, एवढीच आमची मागणी आहे.

# निवडणूक पुढे ढकला!

## महाविकास आघाडीच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाची भेट घेत केली मागणी

मुंबई । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज संस्था तसेच मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाकडून सलग दुसऱ्या दिवशीही बुधवारी निवडणूक आयोगाची भेट घेऊन प्रश्नांची सरबत्ती केली. मतदारयादी कशासाठी लपवता? मतदार नोंदणी बंद करून ही लपवाछपवी का करता, अशी विचारणा करण्यातज आली. यावेळी काही प्रश्नांची उत्तरे देताना आयोगाचे अधिकारी निरुत्तर झाल्याचे दिसून आले. यावेळी विरोधकांनी वेळ काढू नका, लपवाछपवी करू नका आणि निवडणुका पुढे ढकला अशी मागणी केली.

यावेही राज ठाकरे यांनी विचारले की, बाळासाहेब थोरात गेल्या आठ टर्मपासून ८० ते ९० हजार मतांनी निवडणूक जिंकत असताना यंदा लाखाने कसे पडले? हे कसे शक्य असल्याचे विचारताच आयोगाचे अधिकारी निरुत्तर झाल्याचे दिसून आले. आयोगाला भेटलेल्या शिष्टमंडळामध्ये उद्धव ठाकरे, राज ठाकरे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, रईस शेख, अनिल परब, अनिल देसाई, अजित नवले उपस्थित


▶▶ पान २ वर

# बीडच्या जेलरची नागपूर कारागृहात उचलबांगडी!

बीड । प्रतिनिधी

**येथील जिल्हा कारागृहाचे अधीक्षक पेट्रस गायकवाड यांची अखेर नागपूर कारागृहात बदली करण्यात आली आहे. कैद्यांवर धर्मांतर करण्यासाठी दबाव आणल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर होता. यामुळे राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणाची चौकशी करण्यात आली होती चौकशी अहवाल आल्यानंतर त्यांची बीड येथून नागपूरला बदली करण्यात आली.**


भाजप आमदार गोपिचंद पडळकर आणि





जामिनावर बाहेर आलेल्या कैद्यांनी गायकवाड यांच्यावर हे गंभीर आरोप केले होते. कैद्यांवर धर्मांतर

▶▶ पान २ वर



## धावत्या बसला आग २० जणांचा जळून मृत्यू

जैसलमेर । वृत्तसंस्था

राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात मंगळवारी दुपारी एका धावत्या एसी बसला भीषण आग लागली. या अपघातात आतापर्यंत २० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. अनेक लोक बसमध्येच जिवंत जळाले, तर काहींनी खिडक्या

▶▶ पान २ वर

## शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यासाठी आता २ लाखाचे अनुदान

मुंबई । प्रतिनिधी

जगातील सर्वोत्तम शेती तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापरावे यासाठी परदेशी अभ्यास दौऱ्याचे कृषी विभागामार्फत आयोजन केले जाते. २०१२ नंतरच्या काळात प्रवास, निवास आणि परकीय चलनातील दरवाढ लक्षात घेता, विद्यमान १ लाख रुपयांच्या मर्यादेत शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नव्हती. त्यामुळे अनुदान मर्यादा दुप्पट करून २ लाख रुपये करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हा निर्णय म्हणजे शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न आहे.'' अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यातील शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरील प्रगत कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ विस्तार आणि उत्पादनवाढीच्या नवीन पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे यासाठी राबविण्यात येणाऱ्या ''राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे'' या योजनेत मोठा बदल करण्यात आला आहे. राज्य शासनाने

▶▶ पान २ वर

## ढाका खुन प्रकरणातील चौथा आरोपी पकडला

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स या गजबजलेल्या ठिकाणी पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याची हत्या झाल्याची घटना घडली होती. यातील आरोपी फरार होते तीन अरोपींना ताब्यात घेतल्यानंतर फरार असलेला अरोपी घोडके याला डीवायएसपी पुजा पवार यांनी सापळा रचुन ताब्यात घेतले.**

यश ढाकाचा हत्या करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होते.या हत्या प्रकरणात तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात घेतले होते.यातील चौथा आरोपी निखिल घोडके रा.घोडका राजुरी याला मंगळवारी मध्यरात्री बीड पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांनी ताब्यात घेतले.मिळालेल्या

▶▶ पान २ वर

# एसटी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत राडा

## सदावर्ते गट – शिंदे गटात हाणामारी, ५ जण जखमी

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतील एसटी को–ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत बुधवारी (१५ ऑक्टोबर) मोठी धक्कादायक घटना घडली. वकील गुणरत्न सदावर्ते यांचा गट आणि



एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेचा धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, पोलिसांनी तात्काळ धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणात दोन्ही गटांकडून आरोप–प्रत्यारोप होत आहेत.

एसटी बँक ही माजी खासदार आनंदराव

▶▶ पान २ वर

# तिसऱ्या फेरीत वैद्यकीयच्या २,६५० जागा वाढल्या

मुंबई । प्रतिनिधी

**वैद्यकीय अभ्यासक्रमाची तिसरी फेरी लांबणीवर पडल्याने विद्यार्थी चिंतीत आहेत. त्यातच आता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने देशात २ हजार ६५० नव्या जागा वाढविल्या आहेत. महाराष्ट्रात १५० नव्या जागांना मान्यता मिळाली आहे. या**



**जागांचा तिसऱ्या फेरीत समावेश करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची अधिक संधी उपलब्ध होणार आहे.**

रुग्णांच्या तुलनेत डाक्टरांची संख्या कमी आहे. केंद्र सरकारने देशातील डॉक्टरांची संख्या वाढविण्यासाठी नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि जागा वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग

▶▶ पान २ वर

## झोपडपट्टीवासीयांचे स्वप्न दोन वर्षात पूर्ण करणार–मुख्यमंत्री फडणवीस

पुणे । प्रतिनिधी

समूह विकासाच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले आहे. या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सुंदर व सर्व सुविधायुक्त असे घर मोफत देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होणार आहे. कुणालाही विकास आणि घरापासून वंचित राहू देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रमाबाई आंबेडकर व कामराज नगर

▶▶ पान २ वर

## पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण २७ टक्क्यांपर्यंत वाढवा; साखर उद्योगाची मागणी

पुणे । प्रतिनिधी



देशाने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे ध्येय साध्य केले आहे. आता साखर उद्योगाने सरकारकडे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण २७ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची विनंती केली आहे. जेणेकरून जैवइंधन निर्मितीच्या अतिरिक्त

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३०.५० क्विंटल | २,३५० | २,६७० | २,५०७ |
| ज्वारी/हायब्रिड : ७२.०० क्विंटल | २,२५० | ३,१११ | २,५८५ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ४,८०० | ५,२०० | ५,००० |
| बाजरी: ९६.०० क्विंटल | २,००० | २,८३८ | २,४८० |
| मुग: ७.०० क्विंटल | २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ३१५.०० क्विंटल | २,७०० | ४,०२५ | ३,८०१ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,३०० | ४,३०० | ४,३०० |

# आतिश तोडकर : वडिलांच्या त्यागातून घडलेला मल्ल !

## पाच एकर शेती विकून बापानं स्वप्न पेरलं अन् मुलानं सुवर्ण जिंकलं!

आष्टी । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातली आष्टी तालुक्यातलं मंगरूळ हे एक छोटंसं खेडं. या गावातल्या रांगड्या मातीने एका मल्लाला घडवलं त्याचं नाव आतिश तोडकर. नुकत्याच दिल्लीत पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत आतिशने संपूर्ण महाराष्ट्राचं आणि विशेषत: आपल्या गावाचं नाव उज्वल केलं. पण या यशामागे दडलेली कथा केवळ मेहनतीची नाही तर ती आहे बापाच्या अफाट त्यागाची, स्वप्नांवर असलेल्या विश्वासाची आणि त्या विश्वासाला तडफेने साकार करणाऱ्या मुलाच्या जिद्दीची.**



आतिशचे वडील, सुनील तोडकर, यांची आर्थिक परिस्थिती फारशी सशक्त नव्हती. घरात साधनसामग्री नव्हती, रोजच्या गरजा भागवतानाच संकटांचा सामना करावा लागत होता.

▶▶ पान २ वर

### सुवर्णाचा तेजस्वी क्षण...

दिल्लीत पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत, आतिशने आपल्या कुशाग्र आणि आक्रमक खेळाने प्रतिस्पर्ध्यांना चित्तथरारक लढतीत पराभूत करत सुवर्णपदक मिळवलं. हा क्षण केवळ एका स्पर्धेचा विजय नव्हता, तर तो एका त्यागाची आणि मेहनतीची जिंकलेली लढाई होती.

### ऑलिम्पिक हे अंतिम स्वप्न!

आज सुनील तोडकर यांचे डोळे पाणावले आहेत पण ते आनंदाश्रू आहेत. त्यांनी आपल्या सगळ्या बाबींचा त्याग केला, आणि मुलाने त्यांच्या त्या स्वप्नाचं सोनं केलं. आता त्यांचं अंतिम स्वप्न आहे, ते म्हणजे ''मुलाला ऑलिम्पिकमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करताना त्यांना पाहायचंय.

cmyk

अग्रलेख

# मतदार यादीतील घोळ आघाडीसाठी धोकादायकच

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे. हे सगळे मुद्दे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या समोर मांडले गेले आहेत. या अपूर्ण आणि चुकीच्या यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायला विरोधी पक्षांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही बिहारप्रमाणे मतदार याद्यांचे विस्तृत फेरतपासणी करणे गरजेचे बनले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे सर्व ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे एक शिष्टमंडळ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना सतत दोन दिवस भेटले. महाराष्ट्रातल्या मतदार यादीतील घोळ त्यांनी चोकलिंगम यांच्या कानावर घातला. या चर्चेच्या वेळी अनेक आक्षेप नोंदवले गेले. त्यावर नेमकेपणाने उत्तर देण्यासाठी चोकलिंगम यांनी वेळ मागून घेतला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील मतदार यादीचा घोळ काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय पातळीवरून निदर्शनाला आणला. कर्नाटकात कशाप्रकारे घोळ झाला याचे तपशीलवार वर्णन त्यांनी दोन पत्रकार परिषदांमध्ये केले. त्याचवेळी त्यांनी महाराष्ट्रातही असाच मोठा घोळ झाल्याचा दावा केला होता. आता विधानसभा निवडणुकीसाठीची जी मतदार यादी अस्तित्वात आहे त्याच यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या गेल्या, तर त्या भाजपलाच अनुकूल ठरतील आणि महाविकास आघाडीला ही यादी नुकसानदायक ठरेल हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने मनसेला बरोबर घेऊन एकत्रितपणे यावर आवाज उठवला आहे. यात समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष अशा सगळ्या छोट्या पक्षांनाही बरोबर घेतले गेले आहे. त्यांनी एकत्रित म्हणणे सादर केल्यानंतर त्यावर विचार करणे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना भाग पाडले आहे. ते यावर काय भूमिका घेणार यावर सगळे अवलंबून आहे. महाराष्ट्रात झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर केवळ पाचच महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्रातील मतदार यादीमध्ये लक्षावधी मतदारांची नावे नव्याने जोडली गेली. हे मतदार इतक्या मोठ्या प्रमाणात कसे वाढले? हा मुख्य आक्षेप आहे. सरासरी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात २५ ते ३० हजार मतदारांची वाढ झाल्याचे काहींचे म्हणणे आहे.

बिहारमध्ये अगदी अल्पावधीत हे फेरतपासणी म्हणजेच 'एसआयआर' केले गेले. अगदी घाईघाईने निवडणुकीच्या तोंडावर राजकीय हेतूने मतदार याद्यांमध्ये घोळ घालण्यासाठीच हा उद्योग केला गेला असा सर्रास आरोप झाला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घ्यायच्या आहेत, त्यामुळे अशा प्रकारचा एसआयआर उपक्रम महाराष्ट्रात राबवायला फारच कमी वाव आहे. त्यामुळे या याद्यांची दुरुस्ती हे एक अवघड आव्हान सगळ्यांच्या पुढेच उभे आहे. यावर काय तोडगा निघणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरले आहे.

## बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बोलावली बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आज (दि.१६) सायंकाळी ४ वाजता बैठक आयोजित केली आहे.**



या बैठकीत आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा होणार आहे. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविली जाणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीस स्थानिक कार्यकर्ते, इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

## ओबीसी समाजाच्या अस्मितेसाठी महाएल्गार सभेस बहुसंख्येने उपस्थित रहावे -निखिल शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

**ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून ओबीसी समाजाच्या अस्मितेसाठी या सभेस ओबीसी समाजातील बंधू - भगिनींसह युवक, युवती आणि विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे यांनी केले आहे.**

शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील



छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला ओबीसी समाजातील बंधू-भगिनीसह समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे यांनी केले आहे.

# गरिबीचा न्यूनगंड न बाळगता विद्यार्थ्यांनी गुणवंत व्हावे-राजेश राऊत



**जालना । प्रतिनिधी**

**गुणवत्तेत श्रीमंत- गरीब असा भेदभाव नसतो, महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासह अनेक महापुरुष व तज्ञांनी गरिबीत शिक्षण घेऊन जिद्द, मेहनत, व ज्ञान प्राप्त करण्याची लालसा या बळावर स्वत:ला सिद्ध करून दाखवले. विद्यार्थ्यांनी परिस्थितीचा न्यूनगंड न बाळगता अभ्यास, मेहनत करावी असे प्रतिपादन राजेश राऊत यांनी केले .**

नागसेन ग्रंथालयात मिसाईल मॅन भारतरत्न पद्मविभूषण डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त बुधवारी ( ता. १५) वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी बबनराव रत्नपारखे हे होते. ग्रंथालयाचे अध्यक्ष राजेश राऊत, संजय भालेराव, यशवंत राऊत, संदिप पवार, वैभव जोशी, शेख अकबर, सुहास गडकरी, डि. बी. पळसकर, बी. डी. पडूळ, सखाराम बोरुळ, पवन लाड यांची यावेळी उपस्थिती होती. राजेश राऊत यावेळी म्हणाले, सामान्य कुटुंबातील डॉ. कलाम यांनी भारताला जागतिक स्पर्धेत पहिल्या स्थानावर आणण्यासाठी आपल्या असामान्य कर्तृत्वाने पाच मिसाईल दिले, अग्निपंख चरित्रातून त्यांनी युवा पिढीला प्रेरणा दिली, असे राजेश राऊत यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोपात बबनराव रत्नपारखे यांनी डॉ.कलाम यांच्या कार्यावर प्रकाश टाकून देशाला अण्वस्त्र सज्जतेत त्यांचे योगदान अतुलनीय असल्याचे नमूद केले.

## पान १ वरून...

### अतिवृष्टीबाधितांना ४८० कोटी

तर जालना जिल्ह्यातील ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत ९८६.३३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ८३ लाख ८४ हजार रुपयांच्या वितरणास मान्यता देण्यात आली. यामध्ये १ हजार ८२७ बाधित शेतकऱ्यांचा समावेश आहे. तर हिंगोली जिल्ह्यात सप्टेंबरसाठी ६४ कोटी ६१ लाख ८३ हजार रुपयांच्या वितरणास मान्यता दिली असून याम्धेय १ लाख ५ हजार १२० शेतकऱ्यांचं ५५३७२.७० हेक्टर क्षेत्र बाधित असल्याचं शासन निर्णयात सांगण्यात आलं आहे. असे एकूण ६ लाख ७२ हजार २८८ शेतकऱ्यांसाठी ४८० कोटी ५० लाख ३७ हजार रुपये राज्य सरकारने मंजूर केले आहे. यामध्ये ५३७३७८.५१ हेक्टर बाधित क्षेत्राचा समावेश आहे. म्हणजे या क्षेत्राचे पंचनामे झाले असून त्यानुसार मदत दिली जात आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतीपिकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना भरीव मदतीची अपेक्षा होती. त्यानंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निणर्यात मात्र एनडीआरएफच्या निकषांनुसार मदत देण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले होते. तरीही राज्य सरकार मात्र शेतकऱ्यांना भरीव मदत केल्याचा दावा करत आहे.

---------

### बीडच्या जेलरची नागपूर

करण्यासाठी दबाव टाकणे, नकार देणाऱ्या कैद्यांचा छळ करणे, भजन-आरती बंद करणे आणि महापुरुषांचे फोटो हटवून बायबलमधील श्लोक लावणे अशा तक्रारी होत्या. यापूर्वी गायकवाड यांच्यावर विनापरवाना वृक्षतोड आणि कैद्यांकडून खासगी वाहन धुवून घेतल्याचेही आरोप होते. या सर्व गंभीर आरोपांची पुणे आणि छत्रपती संभाजीनगरच्या दक्षता पथकांनी कसून चौकशी केली. चौकशीचा अहवाल सादर झाल्यानंतर प्रशासनाने तातडीने पाऊल उचलत गायकवाड यांची बीडमधून नागपूर येथील कारागृहात बदली केली आहे. या बदलीमुळे बीडच्या कारागृह प्रशासनातील वादावर सध्या तरी पडदा पडला आहे.

-----------

### निवडणूक पुढे

होते. आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे सुद्धा उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडाव्यात अशी मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी आयोगाला चांगलं सुनावलं. ते म्हणाले की आमचं तुमचं करत बसू नका आमच्यासाठी निवडणूक एकच आहे. जोपर्यंत राजकीय पक्षांचे एकमत होत नाही तोपर्यंत निवडणूक घेऊ नका, अशी मागणी त्यांनी केली. तुम्ही सत्तेतील तीन पक्षांसाठी तुम्ही काम करत नाही, असे म्हणत त्यांनी आयोगाला टोला लगावला. मतदान नोंदणी बंद करून लपवाछपवी कशासाठी करत आहात? निवडणुका राजकीय पक्ष लढवतात, तर राजकीय पक्षांना शेवटची मतदारयादी का दाखवली जात नाही? अशी विचारणा त्यांनी केली. दुसरीकडे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा आयोगाची झाडाझडती घेतली. जर त्रुटींसह निवडणुका घ्यायच्या असतील तर निवडणुका घ्यायच्या कशाला डायरेक्ट इलेक्शन फॉर सिलेक्शन करून टाका, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. निवडणूक आयोग जबाबदारी आमच्याकडे नाही म्हणते, मग आम्ही कोणाशी बोलू? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सुद्धा आयोगाला सवाल केले. ते म्हणाले की आम्ही विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ज्या त्रुटी सांगितल्या होत्या त्यावर काम झालेले नाही. आता स्थानिक स्वराज्य निवडणुका होत आहेत, त्याबाबतही अनेक तक्रारी असल्याचे बाळासाहेब थोरात म्हणाले.

-------------------

### ढाका खुन प्रकरणातील

माहितीनुसार, रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घोडका राजुरी येथे स्वतः डीवायएसपी पूजा पवार यांनी सापळा रचून निखिल घोडके याला पकडले. या कारवाईनंतर पोलिसांच्या ताब्यात या प्रकरणातील एकूण चार आरोपी आले आहेत. यशच्या खुनानंतर पोलिसांनी तपास चार आरोपींना ताब्यात घेतले यातील तीन आरोपी बीड जिल्हा कारागृहात आहेत. निखिल घोडके कडून आणखी काही माहिती मिळते का?या हत्या मध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का?याचा तपास बीड पोलीस अधीक्षक पूजा पवार करत आहेत.

-----------

### शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यासाठी

या योजनेअंतर्गत प्रति शेतकरी दिल्या जाणाऱ्या अनुदानाची कमाल मर्यादा १ लाखांवरून वाढवून २ लाख इतकी करण्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाकडून जारी करण्यात आला आहे. राज्यातील शेतकरी या योजनेअंतर्गत आतापर्यंत अमेरिका, इस्रायल, जपान, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, फ्रान्स, थायलंड इत्यादी देशांतील शेतीतील नवकल्पना, सिंचन तंत्र, पिक उत्पादन व्यवस्थापन, कृषी प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि निर्यातक्षम शेतीपद्धती यांचा अभ्यास करून आलेले आहेत.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, '' या निर्णयामुळे आता देशाबाहेर अभ्यास दौऱ्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रवास खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल २ लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण अनुभव घेता येईल तसेच प्रगत देशांतील शेतीपद्धतींचा अभ्यास करून त्या आपल्या शेतीत राबविण्याची प्रेरणा मिळेल.'' भरणे पुढे म्हणाले, ''ही योजना सन २००४-०५ पासून कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना विदेशात जाऊन तेथील आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील यशस्वी मॉडेल्स आणि बाजारपेठीय पद्धतींचा अभ्यास करता यावा, यासाठी या निर्णयाची अंमलबजावणी कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येईल. योजनेअंतर्गत निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी अर्जांची छानणी जिल्हा कृषी अधिकारी, राज्यस्तरीय समित्या आणि कृषी आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून केली जाईल.

-----------

### धावत्या बसला आग

तोडून कसेबसे आपले प्राण वाचवले. आग लागल्यानंतर बसचा दरवाजा लॉक झाला होता, त्यामुळे लोकांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. दरम्यान, आगीत बळी पडलेल्या २० जणांची ओळख पटविण्यासाठी डीएनए सॅम्पल घेतले जात आहेत. अपघातानंतर १९ गंभीररित्या भाजलेल्या प्रवाशांना जोधपूरला हलवण्यात आले, त्यापैकी बहुतेकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित लोक आणि त्यांच्या कुटुंबासोबत आहेत. जे जखमी आहेत ते लवकर बरे होण्यासाठी मी प्रार्थना करतो,'' असे पंतप्रधान मोदी ते म्हणाले होतो. मृताच्या नातेवाईकांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये नुकसानभरपाई दिली जाईल,'' असेही त्यांनी सांगितले.

----------

### तिसऱ्या फेरीत वैद्यकीयच्या २,६५०

दरवर्षी वैद्यकीय महाविद्यालयांसह नवीन जागांना मान्यता देत आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाअंतर्गत असलेल्या वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक लांबणीवर टाकल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. एमसीसीने वैद्यकीय महाविद्यालयांत देशात २ हजार ६५० जागा वाढविल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १५० जागांचा समावेश आहे. नव्याने मान्यता मिळालेल्या या जागांमुळे देशातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांची संख्या १ लाख २६ हजार ७२५ इतकी झाली आहे. हरियाणा, राजस्थान आणि तामिळनाडूमध्ये सर्वाधिक जागा वाढल्या आहेत. या तिन्ही राज्यांमध्ये प्रत्येकी ३०० जागांना मान्यता मिळाली आहे. त्या खालोखाल आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेशात

------

### एसटी बँकेच्या संचालक मंडळाच्या

अडसूळ यांच्या ताब्यात असलेली एशियातील सर्वात मोठी सहकारी बँक मानली जाते, जी एसटी कर्मचाऱ्यांच्या कष्टाने उभी राहिली. मात्र, गेल्या काही वर्षांत राजकीय गटबाजीमुळे बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. २०२३ मध्ये सदावर्ते यांच्या पॅनलने बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजय मिळवला, ज्यामुळे शिंदे गट आणि सदावर्ते गट यांच्यातील वाद सुरू झाला. गेल्या दोन वर्षांत अशा बाचाबाच्यांचे अनेक प्रकार घडले आहेत. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी बँकेच्या संचालक मंडळाची हकालपट्टी करण्याची मागणी केली होती, पण राजकीय हस्तक्षेपामुळे ती पूर्ण झाली नाही. बुधवारी मुंबईतील बँकेच्या कार्यालयात संचालक मंडळाची बैठक आयोजित केली गेली. सदावर्ते गट आणि शिंदे गटाच्या पॅनलचे सर्व संचालक उपस्थित होते. बैठकीत दोन्ही गटांनी एकमेकांवर भ्रष्टाचार आणि निधी गैरवापराचे आरोप केले. सदावर्ते गटाच्या एका व्यक्तीने बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांशी अश्लील वर्तन केल्याचा आरोप शिंदे गटाने केला. या आरोपांमुळे उग्र झालेल्या सदावर्ते गटाच्या सदस्याने माजी संचालक आनंदराव अडसूळ यांच्या दिशेने पाण्याची बॉटल फेकली. यानंतर दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक शिवीगाळ सुरू झाली, त्यानंतर त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. या घटनेची माहिती मिळताच परिस्थिती तणावपूर्ण झाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही गटांना शांत केले. हाणामारीनंतर शिंदे गटाचे कार्यकर्ते आधीच पोलिस ठाण्यात पोहोचले, तर सदावर्ते गटाचेही सदस्य तिथे दाखल झाले.

---------.

### पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण

क्षमतेचा पूर्णपणे वापर होईल. साखर उद्योगाने इथेनॉल उत्पादनांसाठी सुमारे ४० हजार कोटींची गुंतवणूक केली आहे. त्यांची दरवर्षी ९०० कोटी लिटरपेक्षा अधिक उत्पादन क्षमता आहे. यामुळे आम्ही २० टक्क्यांच्या पलीकडे जाऊन २७ टक्क्यांपर्यंत आणि त्याहून अधिक मिश्रणासाठी इथेनॉल पुरवठा करण्याची आमची तयारी आहे, असे इंडियन शुगर अँड बायोएनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे महासंचालक दीपक बल्लानी यांनी म्हटले आहे. हा वेग कायम ठेवणे आणि उत्पादन क्षमतेचा चांगला वापर करणे तसेच लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उच्च, स्थिर उत्पन्नाची खात्री मिळण्यासाठी एक ठोस स्वरुपाचा, कालबद्ध राष्ट्रीय इथेनॉल मोबिलिटी रोडमॅप अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. गेल्या तीन वर्षांपासून बी-हेवी मोलॅसिसच्या आणि उसाच्या रसापासूनच्या इथेनॉल खरेदीचे दर स्थिर आहेत. यामुळे आर्थिक दबाव निर्माण झाला असल्याचे साखर उद्योगाचे म्हणणे आहे.

----------

### आतिश तोडकर : वडिलांच्या

पण त्यांचं एक स्वप्न होतं ''माझा मुलगा एक मोठा पैलवान व्हावा.'' त्या स्वप्नासाठी त्यांनी घरची पाच एकर शेती विकली. ही शेती त्यांच्या आयुष्याचा आधार होती. पण त्यांनी हृदयावर दगड ठेवून ती विकली. कारण त्यांना मुलाच्या भविष्यावर भरवसा होता. वडील व चुलते यांच्याकडून म्हणजे घरातून आलेली प्रेरणा आणि बापाच्या त्यागाची जाणीव यामुळे आतिशने कधी मागे वळून पाहिलं नाही. त्याने सतत मेहनत केली. गरिबी, अपुरं पोषण, अपुरे सराव साहित्य या सगळ्या अडचणींना झुगारून आतिशने १९ वेळा राष्ट्रीय स्तरावर कुस्ती खेळली. अनेक स्पर्धांमध्ये पराभवाचे चटके सहन केले, पण तो खचला नाही. कारण तो लढत होता केवळ प्रतिस्पर्ध्यांशी नाही, तर परिस्थितीशी देखील. आतिश तोडकरची कहाणी ग्रामीण भागातल्या इतर तरुणांसाठी एक मोठा संदेश घेऊन आली आहे की मर्यादा असल्या तरी स्वप्न मोठं असायला हवं, आणि त्यासाठी झगडायची तयारी हवी. आजच्या काळात जिथे खेळासाठी शहरी सुविधा आवश्यक मानल्या जातात, तिथे आतिशने आपल्या मेहनतीने ही संकल्पना मोडून दाखवली. या ठिकाणी उल्लेखनिय म्हणजे, आतिशने वडील व चुलत्यांसोबत तालमीत सराव सुरू केला. त्याची प्रगती पाहून त्याला प्रथम प्रा. दिनेश गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली आळंदी येथे, तर नंतर दिल्लीतील वीरेंद्र स्पोर्ट्स अकादमी येथे १० वर्षे प्रशिक्षणासाठी ठेवण्यात आले.

**मान्यवरांची मदत आली कामाला**

आष्टी तालुक्यातील मंगरूळ येथील आतिश तोडकर याने दिल्लीतील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. पण सुरुवातीच्या काळामध्ये त्याला मल्ल करण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस, जिप. सदस्य सतीश शिंदे तसेच गावचे रहिवासी उद्योजक बंडू तोडकर यांनी देखील मदत केली. त्यांची ही मदत आज आतिष च्या खूप कामाला आली आहे.

**आतापर्यंत या पदकांवर कोरले नाव**

नुकतेच आतिशने ऑल इंडिया इंटर रेल्वे चॅम्पियनशिप (दिल्ली) स्पर्धेतील ६१ किलो फ्री स्टाइल वजन गटात ५-८ गुणांकनाने बाजी मारत सुवर्णपदक जिंकले. आतिशने आजवर १९ वेळा राष्ट्रीय (नॅशनल) स्तरावर खेळून ४ वेळा सुवर्ण, ३ वेळा रौप्य आणि ४ वेळा कांस्य पदक जिंकण्याची दमदार कामगिरी केली आहे.

---------

### झोपडपट्टीवासीयांचे स्वप्न दोन वर्षात

झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घराचे स्वप्न केवळ कागदावर राहणार नाही तर दोन वर्षांत या परिसरात आधुनिक, सुसज्ज घरे उभी राहतील,'' असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबई महानगर प्रदेशातील माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

----------

## पान ६ वरून...

### उमेदच्या दिवाळी

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी या दिवाळी फराळ महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक श्रीमती सांगितादेवी पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, कार्यकारी अभियंता (बांधकाम नं.१) मोमीन, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता बीडकर, सहाय्यक लेखाधिकारी, उत्तम सातपुते, कट्टे, जोशी, यांचेसह अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

------------

### कापुस उत्पादक शेतकऱ्यांना

यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. गेवराई विधानसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडा विशेषतः बीड जिल्ह्यात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र आहे. एकावर्षी एकच कपाशीचे पिक त्यामुळे घेता येते. एकंदरीत बागायती वर्गवारी मधील सर्व निकष कापुस पिकाला लागु होतात. आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवुन त्यांना या सर्व विषयाची तपशिलाने माहिती देवुन कापुस पिकाचा बागायती पिकामध्ये समावेश करुन बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाईची रक्कम कापुस उत्पादक शेतकऱ्यांना देण्याची आग्रही मागणी केली. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांना यश आले असुन अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे.गेवराई विधानसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडा विशेषतः बीड जिल्ह्यात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र असून या निर्णयामुळे कापुस उत्पादक शेतकऱ्यांना आ. विजयसिंह पंडित यांच्या सह मराठवाड्यातील आमदारांच्या प्रयत्नांमुळे नुकसान भरपाई मिळणार असल्यामुळे शेतकरी वर्गातुन समाधान व्यक्त केले जात आहे. सरकारने तात्काळ घेतलेल्या या निर्णयामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी सरकारचे आभार मानले आहेत. यावेळी आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ. राजेश विटेकर आणि आ. संदीप क्षीरसागर उपस्थित होते.

-----------

### बीड न.प. निवडणुक

मैनुद्दीन,शाहीन कुरैशी,राधा घोरपडे या रणरागिणींनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला, जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांचे भगवा गमजा व शिवबंधन बांधून स्वागत करण्यात आले.या आढावा बैठकीला जिल्हा सहसंघटक श्रीकृष्ण गायके, तालुका सहसचिव संदिप भानप, डॉ. आसिफ कुरैशी, अकाश घोरपडे,यश कसबे ,माया घोरपडे, किर्ती घोरपडे ,दिपा जाधव, प्रेरणा कसबे, भैय्या सदामे ,करण वाघमारे,रोहन ओव्हाळ, मयुर घोरपडे, दिनेश जाधव, अभिजित शिंदे, संतोष काळे , बप्पा खांडे , मुन्ना जाधव, तुषार कांदे , विचिष्ट वाघमारे , प्रविण काळे , मच्छिंद्र काळै , नितिन काळे , अजित काळे ,बाबू काळे , देविदास देवगुडे राजेश थोरात ,सुदामा काळे ,अकाश वाघमारे यांच्यासह शहरातील इच्छुक उमेदवार व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले.

**जिल्ह्यात काँग्रेस स्वबळावर**

जिल्ह्यात न लढल्यामुळे पक्ष संघटनेचे देखील नुकसान झालेले आहे. प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मागील काळात लढण्याची संधी मिळाली नाही याची खंत आम्हाला देखील आहे. येणाऱ्या काळात काँग्रेसला सन्मानजनक आघाडीत वाटा मिळाला तर आम्ही आघाडीत राहु नसता जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आमच्या नेत्या खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस स्वबळावर लढणार असुन कार्यकर्त्यांनी पुर्ण ताकतीने निवडणुकीच्याकामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक इलियास टेलर, माजी नगरसेवक शफीक जमादार, फरीद देशमुख, शेख सिराज, रमेश पाटील, संतोष निकाळजे, विद्या गायकवाड, शेख मोहसीन, राहुल साळवे, गणेश करंडे, अक्षय मुळे, अमोल पाठक, गणेश जवकर, शेख कादर बाबमिया, भैय्या गोरे, ओंकार नवले, अविनाश डरपे, पिनू डांगे, श्रीमंत घोडके, लक्ष्मण पवळ, कल्याण टेकाळे, अशोक जोगदंड, अशोक बहिरवाल, आकाश मस्के, मिलिंद मस्के, विशाल साबळे, आशिष सोनवणे, शेख मुशर्रफ, शेख साद, इंजि. जमील अन्सारी, सय्यद फरहान, आदित्य मस्के, शेख नेहल, सोफियान शहा, आहेतशाम शेख, सफदर देशमुख, शेख अब्बास, शेख जहीर, शेख जमील यांच्यासह असंख्य पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते.

-------------

### पारनेरच्या आर्टस महाविद्यालयास

प्रा. शैलजा बरूरे यांनी केले स्पर्धेच्या निकालाचे वाचन करून आभार प्रा.डॉ.रमेश सोनवळकर यांनी मानले. प्रारंभी स्पर्धेचे उद्घाटन विचारवंत डॉ.शिरीष खेडगीकर,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर,माजी व्यवस्थापकीय संचालक,उद्योजक डॉ. विवेक भोसले,प्राचार्य पी.एस.देशमुख आदींच्या उपस्थितीत झाले.आपल्या मनोगतातून मान्यवरांनी स्व.प्राचार्य भ.की.सबनीस यांच्या कार्याला उजाळा दिला व स्पर्धेचा उद्देश विषद केला.या वक्तृत्व स्पर्धेत विविध ठिकाणच्या ४० महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी अनेक मान्यवर,प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.स्पर्धेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील कर्मचारी वृदांनी परिश्रम घेतले.

------------

### ओबीसीच्या न्याय हक्कासाठी

असूनही आरक्षणाची लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नाही. रोहिणी आयोग लागू झाल्यानंतर या विभागणीमुळे मायक्रो ओबीसींना शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश वाढ राजकीय नेतृत्वाचा विकास व रोहिणी आयोग लागू झाल्यानंतर लहान जातींना स्थानिक व राजकीय पातळीवर राजकीय आरक्षण नेतृत्वाच्या संधी वाढतील. नवीन मायक्रो ओबीसी नेतृत्व वर्ग तयार होईल. त्यासंदर्भात बीड जिल्ह्यातील मायक्रो ओबीसी आलुतेदार बलुतेदार यांच्यासाठी रोहिणी आयोग लागू करावा या मागणीसाठी धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात येईल व तात्काळ रोहिणी आयोग लागू करावा याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ओबीसी उपवर्गीकरण करा इतर मागासवर्गीय जातीचे अ, ब, क, ड अशा चार उपवर्गात विभाजन करून त्याची त्वरित अंमलबजावणी करा, रोहिणी आयोगाच्या समितीने काढलेले निष्कर्ष व सुचवलेल्या शिफारशी खालील प्रमाणे आहेत.१) ओबीसीच्या केंद्रीय यादीत २६३३ ओबीसी जातीचा समावेश आहे २) ओबीसी आरक्षणाचा लाभ प्रामुख्याने प्रबळ प्रगत व वर्चस्वशाली ओबीसी जातींनाच मिळत आहे ३) वंचित व अति मागास ओबीसी जातींना ओबीसी आरक्षणाचा लाभ देण्यासाठी २७% कोठ्याचे उपवर्गीकरण करण्यात यावे ४) या शिफारशीनुसार केंद्र सरकारने ओबीसी आरक्षणाची पुनर्रचना करावी ५) ओबीसीची जात निहाय जनगणना करावी या व इतर मागण्यासाठी हा लढा मायक्रो ओबीसी समाजाला न्याय देण्याचा आहे तात्काळ रोहिणी आयोग नेमण्यात यावा नसता ग्रामीण युवक संघटना तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या निवेदनात दिला आहे.

------------

### ओबीसी महाएल्गार

नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला परीट धोबी समाजातील बंधू-भगिनीसह ओबीसी समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परीट - धोबी सेवा महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप यांनी केले आहे.

----------

### गुरु तेग बहादूर यांच्या

- - जी ३५० वी शहीद समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समिती यांनी मा. मुख्यमंत्री यांना विनंती केली. कार्यक्रमाचे आयोजन सिख, शिकल करी, बंजारा, लबांना,मोहियल, सिंधी समाज बांधव एकत्रितपणे करीत आहेत. यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील एकत्रित येऊन करीत आहेत. यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये बीड जिल्ह्यातील जिल्ह्यामधून सामाजिक कार्यकर्ते तथा परळी शहरातील सर्व समाज बांधव यांची समितीच्या सहसचिव पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल घमंड सिंग सुरज सिंग यांच्या वर सर्व स्तरातुन शुभेच्छा तसेच अभिनंदन होत आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात...



आष्टी तालुक्यातील बावी गावात नरभक्षक बिबट्याने राजेंद्र गोल्हार या युवकावर हल्ला करून ठार केले. या ठिकाणी वनक्षेत्र अधिकारी व त्यांची टीम या बिबट्याचा शोध घेत आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून काही लोक तो बिबट्या नसून वाघ असल्याचे सांगत आहेत. याबाबत वनक्षेत्रपाल अधिकारी मुंडे यांनी तपास सुरू असल्याचे सांगितले. (छाया : शरद रेडेकर)

### माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्ताने अभिवादन



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दि. १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी श्री. सुधाकर शिंदे यांच्या हस्ते वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, डॉ. अनंथा गाडे, युवराज जाधव, प्रा. लक्ष्मण वैरागे, रणजित शिनगारे, अनंत पंडित यांबरोबरच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पूरग्रस्तांना मदत



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात व मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्तांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिवाळीनिमित्त नवीन कपडे व साहित्याचे वाटप करण्यात आले या मदत फेरीच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी शर्ट साड्या ब्लँकेट्स इत्यादी कपड्याची संकलन करून महाविद्यालयाच्या वतीने जिल्हा समन्वयक डॉक्टर अरुण दयतकर यांना ही मदत बंकट स्वामी महाविद्यालयात स्वीकृत करण्यात आली यावेळी महाविद्यालयाची सन्माननीय प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या शुभहस्ते प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमाधिकारी डॉ लोखंडे सर प्राध्यापक बापू घोक्षे प्राध्यापक प्रकाश नाईकवाडे प्राध्यापक बाळासाहेब जोशी आणि महाविद्यालयातील स्वयंसेवक उपस्थित होते माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या वतीने ही मदत बीड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना वाटप करण्यात येणार आहे या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू गोखले प्राध्यापक लोखंडे राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेवक सौरभते मॅडम प्राध्यापक सुर्वे सर कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्राध्यापक नाईकवाडे सर प्राध्यापक भुरे सर प्राध्यापक भगत सर प्राध्यापक वंदन जाधव सर यांनी सहकार्य केले या समाज उपयोगी कार्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाची महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# ‘जोगेश्वरी’ चा पुरग्रस्तांना मायेचा ओलावा

## शिरूर कासार तालुक्यातील चारशे आपत्तीग्रस्तांना मदत

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

**अतिवृष्टी आणि पुराने दिवाळीच्या तोंडावर प्रचंड नुकसान झाल्याने हातबल झालेल्या शिरूर कासार तालुक्यातील शेतकरी कुटुंबांना पुण्यातील जोगेश्वरी मिसळ उद्योग समूहाने मायेचा ओलावा दिला आहे. ‘‘जोगेश्वरी‘‘ मिसळ उद्योग समूहाचे अध्यक्ष सचिन हरगुडे व नितीन हरगुडे यांच्या पुढाकारातून दिवाळीनिमित्त शिरूर कासार (जि. बीड) तालुक्यातील पुरग्रस्त ४०० शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी तीन हजार रुपये किंमतीचे किराणा साहित्य वाटप केले आहे. राज्यभरात जोगेश्वरी मिसळ कडून सुमारे दीड हजार कुटुंबांना साहित्य भेट दिले आहे.**

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यासह अनेक भागात अतिवृष्टी पुराने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. सिंदफना नदीसह सर्व नद्यांना पूर आल्याने नदीकाठची शेती पिके वाहून गेलीच, परंतु नदीकाठी असलेल्या शेकडो कुटुंबाच्या घरात पाणी शिरून संसार उपयोगी साहित्याची झाली हानी झाली. ऐन दिवाळीच्या अनेक शेतकऱ्यांच्या तोंडचा खास हिरावला आहे. शेतकरी तसेच पुराने नुकसान झालेले अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली. दिवाळीच्या तोंडावर आपत्ती आल्याने दिवाळीवर सावट आहे. अशा काळामध्ये पुण्यातील ‘‘जोगेश्वरी‘‘ मिसळ उद्योग समूहाने शेतकऱ्यांना मायेचा ओलावा दिला आहे. जोगेश्वरी उद्योग समूहातर्फे राज्यातील दीड हजार पूरग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी तीन हजार रुपयाचे किराणा साहित्य भेट देण्यात आले. बुधवारी शिरूर कासार जिल्हा बीड येथील कानिफनाथ संस्थान येथे बुधवारी (ता. १५) मठाधिपती श्रीरंग स्वामी तळेकर महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला उद्योग समूहाचे अध्यक्ष सचिन लहु हरगुडे व नितीन लहु हरगुडे, निरंजन सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयेश कासट, भीमाबाई कासट, मोहन नाना हरगुडे, आर्यन हिरामण हरगुडे नवनाथ कांचन, अनिल किसन हरगुडे सुयोग पवार, आयुष लोखंडे, अनिकेत शेळखंडे, श्रीकांत वडगावकर, अविनाश गायकवाड, प्रणव गायकवाड, राहुल चव्हाण अविनाश मोरे, आकाश मिस्कीन, संतोष आवारे, आकाश तरवडे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सचिन हरगुडे म्हणाले मी शेतकरी कुटुंबातील आहे शेतकऱ्यांना मदत करणे हे आमचे काम आहे सामाजिक भावना जोपासून आम्ही जेव्हा जेव्हा शेतकऱ्यावर संकटे येतील तेव्हा उभे राहू. शेतकऱ्यांच्या झालेल्या व्यथा पाहून आमच्या बंधूंचा वाढदिवस साजरा न करता सामाजिक जबाबदारीतून शेतकऱ्यांना मदत केल्याचे आम्हाला समाधान आहे असे नितीन हरगुडे यांनी सांगितले. दिवाळीच्या तोंडावर मदतीचा हात मिळाल्याने पूरग्रस्तांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.



शिरूर कासार (जि.बीड) : अतिवृष्टी पुराने नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त किराणा साहित्याचे वाटप करताना श्रीरंग स्वामी तळेकर महाराज ‘‘जोगेश्वरी‘‘ उद्योग समूहाचे अध्यक्ष सचिन लहु हरगुडे व नितीन लहु हरगुडे, निरंजन सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयेश कासट, भीमाबाई कासट, मोहन नाना हरगुडे व इतर.

‘‘ आम्ही शेतकरी कुटुंबातील आहोत. पूर नैसर्गिक आपत्तीने नुकसान झालेल्या शेतकरी कष्टकऱ्यांना आधार देणे ही आमची जबाबदारी समजतो. या भावनेतून व सामाजिक जबाबदारी समजून ‘‘जोगेश्वरी‘‘ मिसळ परिवारातर्फे महाराष्ट्रातील दीड हजार कुटुंबाला दिवाळीनिमित्त आवश्यक साहित्याची भेट दिली आहे. संकट ओढावलेल्या कुटुंबाच्या मदतीसाठी आम्ही नेहमी पुढाकार घेतो.

सचीन हरगुडे, संस्थापक अध्यक्ष, जोगेश्वरी मिसळ उद्योग समूह, पुणे

शेतकरी कष्टकरी कुटुंबावर निसर्गाच्या संकटाने आपत्ती कोसळली अशा काळात शेतकरयांची दिवाळी गोड होण्यासाठी जोगेश्वरी मिसळ उद्योग समूहाचे सचिन हरगुडे व नितीन हरगुडे या बंधूंनी सामाजिक भावनेतून पूरग्रस्तांना दिवाळीनिमित्त साहित्य वाटप केले ही प्रत्येकांसाठी अभिमानाची बाब आहे. निरंजन सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पूरग्रस्तांना आधार देण्याचे काम करत असल्याचा आनंद आहे.

जयेश कासट, संस्थापक अध्यक्ष, पुणे.

## ३ डिसेंबर रोजी राज्यातील १०,००० पत्रकारांची आरोग्य तपासणी करणार :एस.एम.देशमुख

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यातील १०,००० पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा संकल्प परिषदेने सोडला आहे.. एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येत पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा हा विश्व विक्रम असणार आहे असा दावा एस.एम.देशमुख यांनी केला आहे..

३ डिसेंबर १९३९ रोजी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची स्थापन झाली.. गेली दहा वर्षे ३ डिसेंबर हा दिवस राज्यात पत्रकार आरोग्य तपासणी दिन म्हणून पाळला जातो.. पहिल्या वर्षी ३००० पत्रकारांची आरोग्य तपासणी केली गेली..त्यानंतर ही संख्या क्रमशः वाढत गेली.. गेल्यावर्षी ८००० पत्रकारांची तपासणी केली गेली.. वाढता प्रतिसाद पाहून यावर्षी १०,००० पत्रकारांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे..



### विश्व विक्रमाची नोंद होणार

परिषदेशी संलग्न जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांनी स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि डॉक्टरांच्या मदतीने पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी शिबिरं घ्यावीत असं आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, आरोग्य कक्षाचे दीपक कैतके आदिंनी केले आहे. आरोग्य तपासणीत ज्या पत्रकारांना गंभीर आजार असतील त्यांच्या पुढील उपचाराची व्यवस्था परिषदेच्यावतीने करण्यात येणार असल्याची माहिती एस.एम. देशमुख यांनी दिली.



## जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना बीड कार्यकारिणीची निवड

**बीड । प्रतिनिधी**

आज बशीरगंज बीड येथील बागवान ईमारतीमधील कार्यालयात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष शेख वजीर , राज्य सरचिटणीस डी.एम .राऊत,राज्य कार्याध्यक्ष रामहारी घुले,सल्लागार बी.के.उबाळे, राज्यसदस्य प्रभाकर कुलकर्णी आणी मोहन निराळे यांचे अधिपत्याखाली हनीफखान चॉदखान पठाण व नजिऊल्लाखान यांनी आयोजीत केलेल्या बैठकीत सेवानिवृत्त संघटनेची जिल्हा शाखा बीड जिल्हा कार्यकारणीची निवड सर्वानुमते खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

१.बीड जिल्हाध्यक्ष हनीफखान चॉदखान पठाण २.उपाध्यक्ष ध्रूपद यादव ३.सचिव नजीऊल्लाखान ४.कार्याध्यक्ष अफजल मोमीन ५.सहसचिव अशोक कुलकर्णी ६.कोषाध्यक्ष सुग्रीव नेटके ७.महिला प्रतिनिधी शेख मुन्नवर सुलताना व पी.बी.पाळवदे ८.सल्लागार ईस्माईल पटेल ९.प्रसिध्दी प्रमुख शाम मार्कंडे १०. सदस्य दिलीप वखरे, सय्यद चॉद ,दयानंद उजगरे,शाम साबळे,भुजंग देवकते,नारायण हाडूळे,कोल्हे व अंकुश गुंड या नूतन कार्यकारणीस पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा देवून उपस्थितांचे आभार व्यक्त करुन चहापाणी घेवुन सभा संपल्याचे जाहीर केले.

## श्री तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटी राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्काराने सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या श्री तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे.महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.तर्फे दिला जाणारा २०२४-२०२५ चा प्रतिष्ठेचा ‘‘दिपस्तंभ पुरस्काराने दि १३ ऑक्टोबर रोजी संस्थेला सन्मानीत करण्यात आले.

या पुरस्काराचे वितरण १३ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले होते.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती,नाविन्यपूर्ण सेवा व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.सभासदांच्या विश्वासाला मुकुट तुळजाभवानी अर्बनला दिपस्तंभ पुरस्कार संस्थेच्या या यशाबद्दल अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ,सीईओ शहाजी शेजूळ, तसेच संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केला.





२०२४-२५ चा दिपस्तंभ हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे,’’ असे अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ यांनी दै राज्य लोकतंत्रच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.या यशामुळे संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये उत्साह नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास सीईओ शहाजी शेजूळ दै राज्य लोकतंत्रशी बोलताना यांनी व्यक्त केला.

## अ‍ॅड.चंपावती (काकी )पानसंबळ इच्छुकाच्या यादीत अग्रस्थानी

शिरूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारचे आरक्षण जाहीर होताच आ. सुरेश धस यांच्या समर्थक तथा भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या अ‍ॅड.चंपावती काकी पानसंबळ यांनी आदेश अण्णाचा... साथ जनता जनार्दनाची.... अशी सोशल मीडिया वरती पोस्ट करत घाटशीळ पारगाव व पाडळी या दोन्? ही जिल्हा परिषद गटावरून निवडणूक लढवण्याची पुन्हा तयारी दाखवून राजकीय वर्तुळात दिवाळीपूर्वीच बॉम्ब फोडून दिला आहे यामुळे अ‍ॅड.चंपावती (काकी) पानसंबळ इच्छुकाच्या यादीमध्ये अग्रस्थानी असल्याचे बोलले जात आहे.



गेल्या काही वर्षापासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करा असे आदेश निवडणूक आयोगाला उच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवडणूक प्रक्रियेला आता वेग आल्याचे दिसून येत आहे.बीड जिल्ह्यातील ६१ जिल्हा परिषद गटातील उमेदवारांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी निवडणूक लढवण्यासाठी आपली तयारी दर्शवली आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये ही अनेक इच्छुक उमेदवारांची निवडणूक लढवण्यासाठी तयारी असल्याचे दिसून येत आहे. आष्टी -पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या खंदे समर्थक मानल्या जाणाऱ्या अ‍ॅड.चंपावती (काकी )पानसंबळ ह्या इच्छुकाच्या यादीमध्ये अग्रस्थानी असल्याचे दिसून येत आहेत. शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद गटात उमेदवार आरक्षित झाल्यानंतर सोशल मीडिया वरती त्यांनी आदेश अण्णाचा.. साथ जनता जनार्दनाची... अशी पोस्ट करून तालुक्यातील घाटशीळ पारगाव व पाडळी या दोन्ही गटावरती अनुक्रमे सर्वसाधारण महिला व ओबीसी महिला असे महिलांसाठी आरक्षण सुटल्याने या दोन्ही गटावरती आ. सुरेश धस यांचा जसा आदेश येईल त्याचे पालन करून निवडणूक मोठ्या लढवण्याची तयारी दाखवली असल्याने शिरूर तालुक्यातील राजकीय वर्तुळामध्ये दिवाळीपूर्वी बॉम्ब फोडून दिल्याने चर्चेला उधान आले आहे.

## जिल्हास्तरीय शालेय खो खो स्पर्धेत सैनिकी विद्यालयाला दुहेरी मुकुट

बीड । प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड आयोजित जिल्हास्तरीय शालेय खो खो स्पर्धेत सैनिकी विद्यालयाच्या १४ व १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित करत विजेतेपद मिळविले आहे. या दोन्ही मुलांच्या संघाची छत्रपती संभाजीनगर विभागीय शालेय खो खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे , अशी माहिती सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी दिली.

१४ वर्षांखालील मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात प्रतिस्पर्धी संघाला डावाने पराभूत केले. १९ वर्षांखालील मुलांच्या संघानेही अंतिम सामन्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. गेवराई येथे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या छत्रपती संभाजीनगर विभागीय शालेय खो खो क्रीडा स्पर्धांसाठी १९ वर्षे मुलांच्या संघाची निवड झाली आहे. १७ वर्षे मुलांच्या संघाने अंतिम चुरशीच्या झालेल्या सामन्यात उपविजेतेपद पटकावले आहे. या सर्व खेळाडूंना डॉ अविनाश बारगजे , सैनिकी निदेशक सेना पदक विजेते श्री. मेघराज कोल्हे सर व श्री. विजयकुमार धारणकर सर यांचे नियमित मार्गदर्शन लाभत आहे. प्रा. राकेश राऊत , श्री गौतम खेमाडे सर , श्री शिवाजी सोनवणे सर , रविंद्र नहिराळे , वैभव भागवत यांनी यावेळी संघाला मार्गदर्शन केले.



नवगण शिक्षण संस्था राजुरी न. च्या मार्गदर्शिका डॉ दिपाताई क्षीरसागर, संस्था सचिव डॉ. योगेश क्षीरसागर , डॉ . सारिकाताई क्षीरसागर , संस्था प्रशासक डॉ व्ही टी देशमाने सर , प्रा डॉ सुधाकर गुट्टे सर , सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री सचिन पवार सर , जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर , क्रीडा अधिकारी श्री अनिकेत काळे , संतोष वाबळे सर यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून पुढील विभागीय शालेय खो खो स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

१४ वर्षांखालील विजयी संघ

ठोसर करण राजेंद्र, गाडे वेदांत विजय ,श्रेयश सर्जेराव जाधव ,आदित्य श्रीकृष्ण शिंदे , मात्रे आर्यन हनुमंत, मंत्रे यश वैजनाथ, गायकवाड संग्राम वासुदेव , दराडे सार्थक गणेश , बिकड संकेत राजेंद्र, महारनवर सोहम साहेबराव , साबळे समर्थ सुभाष , गायकवाड रुद्र टाटा , तांबारे समर्थ ज्ञानेश्वर ,पोपळे गौरव गणेश , कातखडे ओंकार ज्ञानेश्वर

१९ वर्षांखालील विजयी संघ

बळीराम अशोक शेळके , सुदर्शन सुशील जाधव , ढाकणे महेश तुळशीराम , जाधव साईराज सुनील , सिरसाट समर्थ उत्तम ,जाधव सुग्रीव विष्णू ,धनवे ओंकार नामदेव , फुपाटे रवी बळीराम ,पवार अनिकेत बाळासाहेब ,साईनाथ बाबासाहेब मेहत्रे ,स्वप्नील फुलचंद कापसे , मांडवे सुरज उत्रेश्वर ,मार्कड रुतिक राजेंद्र ,राठोड प्रविण सखाराम, साबळे सिद्धांत ज्ञानदेव

## उमंग फाउंडेशनचा शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा मराठवाडा विभागातील एक कृषिप्रधान जिल्हा असून, इथली बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. परंतु गेल्या काही वर्षांत या जिल्ह्याला दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूर यांचा दुहेरी फटका बसत आहे. यंदाही ऑगस्ट महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांमध्ये नदी-नाल्यांना पूर आला आणि शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतीची पिके वाहून गेली, जनावरांचे खाद्य टंचाईत आले आणि अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावले.अशा कठीण परिस्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक जाणिवेतून उमंग फाउंडेशन, अंबाजोगाई या सामाजिक संस्थेमार्फत एक उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आला. संस्थेने जिल्हा परिषद शाळा, महादेव वस्ती, चिचखंडी (ता. अंबाजोगाई) येथे पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित केला.या उपक्रमांतर्गत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वही,पुस्तक,पेन,पेन्सिल,रबर, तसेच अभ्यासासाठी आवश्यक इतर साहित्य वाटप करण्यात आले.या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य पाहून सर्व उपस्थितांच्या मनात समाधानाची भावना निर्माण झाली.कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक आणि उमंग फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाला गावातील शिक्षक,पालक,ग्रामस्थ आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उमंग फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले बीड जिल्हा हा नेहमीच नैसर्गिक आपत्तींच्या विळख्यात सापडलेला जिल्हा आहे.पूरग्रस्त परिस्थितीत अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊ शकत नाहीत.अशा वेळी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन या विद्यार्थ्यांना हातभार लावणे ही काळाची गरज आहे. उमंग फाउंडेशन ग्रामीण समाजात शिक्षण आणि सक्षमीकरणाच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडविण्यास तसेच गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे.

कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनीही उमंग फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले.शाळेचे मुख्याध्यापक सरांनी सांगितले, अशा वेळेस विद्यार्थ्यांना दिलेले हे सहाय्य त्यांच्या शिक्षणात नवसंजीवनी आणणारे ठरते. ग्रामीण भागातील मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.उमंग फाउंडेशन ही संस्था मराठवाडा, पश्चिम कोकण आणि विदर्भ या भागांमध्ये महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक विकास या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. पूर, दुष्काळ किंवा इतर आपत्तीच्या काळात ही संस्था गरजू कुटुंबांच्या पाठीशी उभी राहते.बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम म्हणजे केवळ साहित्याचे वाटप नव्हे, तर त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात आशेचा किरण निर्माण करणारा प्रयत्न आहे.गावकऱ्यांनी व पालकांनी या कार्याचे मनापासून कौतुक करत उमंग फाउंडेशनचे आभार मानले.संस्थेच्या वतीने आगामी काळात बीड जिल्ह्यातील इतर पूरग्रस्त गावांमध्येही अशा प्रकारचे शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे.

# कृषी विद्यापीठांत बारा सीआयडीएसए स्थापण्यास मंजुरी - कृषिमंत्री भरणे

पुणे : ''राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, संशोधन प्रत्यक्ष शेतात उतरावं आणि तरुणांना कृषी क्षेत्रात करिअर संधी मिळावी, या उद्देशाने 'स्मार्ट कृषी इनोव्हेशन सेंटर'ची (सीआयडीएसए) स्थापना करण्यात येत आहे. हे केंद्र म्हणजे स्मार्ट शेतीकडे वाटचाल करणारा महाराष्ट्राचा पाया ठरणार आहे,'' अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषिमंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद येथे कृषी विद्यापीठांतर्गत 'स्मार्ट कृषी इनोव्हेशन सेंटर' (सीआयडीएसए) स्थापन करण्यात यावे यासाठी नुकतीतच आढावा बैठक पार पडली. यात महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महासंचालक वर्षा लड्डा-उंटवाल, उपसचिव प्रतिभा पाटील, श्रीकांत आंडगे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य उपस्थित होते. भरणे म्हणाले, ''प्रत्येक विद्यापीठात ३ या प्रमाणे महाराष्ट्रात एकूण १२ 'स्मार्ट कृषी इनोव्हेशन सेंटर' सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ६ केंद्रे तर दुसऱ्या टप्प्यात ६ केंद्रे सुरू करण्यात येणार असून, या केंद्रांच्या स्थापनेसाठी कृषी विभाग आणि आय व्हॅल्यू यांच्यात पुढील काही दिवसांत करार करण्यात येईल. या केंद्रांमार्फत राज्यातील



कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास अधिक परिणामकारकपणे राबविण्यात येईल.'' ''प्रकल्पामुळे शेती क्षेत्रात नवकल्पना, अचूकता आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. विद्यापीठांच्या माध्यमातून तयार होणारे नवे प्रयोग थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील आणि कृषी क्षेत्राची उत्पादकता, कार्यक्षमता आणि नफा वाढेल. या केंद्रांच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही गतीमान करावी, तसेच प्रत्येक केंद्र 'शेतकऱ्याच्या शेतात संशोधन' या तत्त्वावर काम करेल याची खात्री करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रांचा प्रसार गतिमान होणार असून, महाराष्ट्र स्मार्ट शेती आणि कृषी नवकल्पनांचा राष्ट्रीय केंद्रबिंदू बनेल आणि ग्रामीण युवांसाठी ॲग्री-टेक स्टार्टअप्स आणि इनोव्हेशन इकोसिस्टिम तयार होईल,'' असे श्री. भरणे यांनी सांगितले.

सीआयडीएसए म्हणजे काय?

'स्मार्ट कृषी इनोव्हेशन सेंटर' (सीआयडीएसए) ही एक प्रगत संकल्पना आहे, ज्याचा उद्देश कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, संशोधन, डेटा विश्लेषण आणि स्मार्ट शेती उपाय विकसित करून ते थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा आहे.

सीआयडीएसए केंद्रांचे महत्त्व

कृषी शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी करणे, शेतीतील समस्यांवर तंत्रज्ञान आधारित उपाय शोधणे, राज्यातील कृषी डेटा बँक आणि स्मार्ट शेती मॉडेल्स विकसित करणे, ग्रामीण युवांसाठी ॲग्री-टेक स्टार्टअप्स आणि इनोव्हेशन इकोसिस्टिम तयार करणे आणि जागतिकस्तरावर महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राची प्रतिस्पर्धात्मकता वाढविण्यासाठी ही केंद्रे महत्त्वाची ठरणार आहेत.

केंद्रांद्वारे होणारे फायदे :

कृषी क्षेत्रातील संशोधन आणि तंत्रज्ञानाचा प्रसार गतिमान होईल. टीओटी, ड्रोन, एआय, रिमोट सेंसिंग, डेटा ॲनालिटिक्स अशा तंत्रांचा उपयोग करून स्मार्ट शेती विकसित होईल. कृषी विद्यापीठे, उद्योग, स्टार्टअप्स आणि शेतकरी यांच्यात समन्वयाचे व्यासपीठ निर्माण होईल. शेतकऱ्यांना तंत्रज्ञान आधारित निर्णयसाह्य, प्रशिक्षण आणि नवकल्पना प्रयोगशाळा यांचा लाभ मिळेल. आधुनिक कृषी ज्ञान आणि तांत्रिक कौशल्यांचे संपादन होईल. नफा आणि शाश्वतता वाढविण्यासाठी धोरणांची अंमलबजावणी करण्यास मदत होईल. कृषी ऑटोमेशन प्रयोगशाळा, एए, स्मार्ट प्रिसिजन ॲग्रिकल्चर लॅब, एआर, व्हीआर सर्व्हिसेस लॅबसह कृषी तंत्रज्ञान सोल्युशन्स, कृषी उपकरणे इनोव्हेशन लॅब, शेतीसाठी प्रगत ड्रोन तंत्रज्ञान आणि जिओस्पेशिअल फार्मिंग सोल्युशन्स लॅब अशा विविध प्रयोगशाळा तयार होतील.

## रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन

खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. रोपवाटिकेत टोमॅटो पिकाचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी महत्वाची माहिती जाणून घेऊ या.

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :

साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादी वाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल. गादी वाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे.

लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०-१०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

## गहू पिकाचे व्यवस्थापन; उंदरांसाठी करा हे उपाय

आता रब्बी पेरणी तोंडावर आली आहे. यातील गहू पिकाला अधिक महत्व आहे. शेतकरी काही गोष्टींची काळजी घेऊन गव्हाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने गव्हाला वेळोवेळी पाणी देत आणि तण नियंत्रण करत मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाऊ शकते.



पाण्याची आवश्यकता :गहू या पिकाला सामान्यपणे आपल्या एकूण पीक कालावधीत ३५ ते ४० सेमी इतक्या पाण्याची आवश्यकता असते. यातही गव्हाला मुख्यतः ओंबी लागण्याच्या सुमारास तसेच पिकांच्या प्राथमिक मुळांच्या वाढीसह फुटवा करताना अधिक पाण्याची आवश्यकता असते. याशिवाय ओंबीतील दाणे भरण्यासह या तीन अवस्थांदरम्यान पाणी देण्याची विशेष काळजी घेण्याची गरज असते. अन्यथा गहू उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. पाण्यासोबतच गव्हाला खत नियोजन करणेही तितकेच आवश्यक असते. गव्हाला वेळोवेळी पाणी दिल्यास तुम्ही एकरी उत्पादनात एक ते दोन क्विंटल अधिक उत्पादन मिळवू शकतात. यासाठी शेतकऱ्यांनी गव्हाला नियोजनपूर्वक पाणी आणि खते देणे गरजेचे असते. गहू पिकाला आपल्या एकूण कालावधीत जमिनीच्या प्रकारानुसार एकूण ८ ते १० वेळा पाणी देणे आवश्यक असते. यामध्ये जमीन ही काळपोटी असेल तर कमी वेळा पाणी द्यावे लागते. तर हलक्या जमिनीत गहू पिकाला अधिक वेळा पाणी देणे आवश्यक असते.

गव्हाचे पाणी व्यवस्थापन : गहू पिकाला साधारणपणे आठ ते दहा दिवसांच्या अंतराने पाणी देणे आवश्यक असते. मात्र गहू पिकाच्या वाढीच्या अवस्थांदरम्यान पाणी देण्याबाबत विशेष काळजी घ्यावी लागते. गहू पिकाला प्रामुख्याने पेरणीनंतर मुळांच्या वाढी दरम्यान २०-२५ दिवसांचे पीक असताना पाणी गरजेचे असते. त्यानंतर ४०-६० दिवसांच्या कालावधीत गहू फुटवा करत आणि ओंबी डोकावताना पाणी आवश्यक असते. तसेच ६५-९० दिवसात ओंबी फुलोरा अवस्थेत असताना आणि पिकाच्या वाढीमध्ये कांड्यांची वाढ होत असताना विशेषत्वाने पाणी द्यावे. ९० ते १२० दिवसांचे पीक असताना ओंबी भरताना पाणी देण्यावर विशेष भर द्यावा. जेणेकरून गहू उत्पादनात भरघोस वाढ होण्यास मदत होईल. पाणी नियोजनासह तण व्यवस्थापन देखील तितकेच आवश्यक असते. गहू पिकाला खते दिल्यानंतर त्यातील ४७ टक्के नायट्रोजन, ४२ टक्के फॉस्फरस, ५० टक्के पोटॅश, २४ टक्के मॅग्नेशियम आणि ३९ टक्के कॅल्शियम तण वापर करत असते. तण वाढल्यास ते गहू पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव होण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे योग्य त्या अवस्थेत तण व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

गहू काढणी अवस्थेतील काळजी :गहू पिकावर कोणत्याही अवस्थेत एखाद्या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास प्रोपीकोनॅझोल ०.१ टक्के किंवा मॅन्कोझेब ०.२ टक्के मिश्रण करून फवारावे. याशिवाय गहू पिकाचा उंदरांपासून बचाव करण्यासाठी झिंक फॉस्फाईड किंवा अल्युमिनियम फॉस्फाईडच्या गोळ्या बनवून पिकामध्ये ठेवाव्यात. यामुळे गहू पिकाला उंदरांचा त्रास होणार नाही.

## खरडून गेलेल्या जमिनीवर अशा करा उपाययोजना

यंदा अतिवृष्टीच्या थैमानामुळे शेतातील मातीचे थर वाहून गेले. लगेच पेरणी करण्यासारखी जमीन उरलेली नाही. नैसर्गिकरीत्या मातीचा एक सें.मी. जाडीचा थर तयार होण्यासाठी ८०० ते १००० वर्ष लागतात. त्यामुळे दुसऱ्या ठिकाणावरून माती आणून शेतात टाकण्याशिवाय सध्या दुसरा उपाय नाही. परंतु ही माती आणताना मातीचा प्रकार, मातीचा पोत तसेच मातीची रचना सुधारण्यासाठीच्या उपाययोजना जाणून घेऊन शेतकरी मातीचे आरोग्य सुधारू शकतात.

मातीचे थर आणि उपाय :माती आणण्यापूर्वी मातीच्या कोणत्या थरापर्यंत जमिनीची धूप झाली आहे हे तपासावे. मातीचा केवळ वरच्या सेंद्रिय थराची धूप झाली असल्यास गाळाची मातीची भर दिली तरी माती पिकासाठी योग्य होते. कारण या थरामध्ये वनस्पती आणि प्राण्यांचे कुजलेले अवशेष असतात. त्यामुळे माती सुपीक बनते. सेंद्रिय थराच्या खालोखाल टॉप सॉईलचा थर म्हणजेच वरची माती असते. हा थर सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असतो, जो वनस्पतींच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या थरामध्ये सूक्ष्मजीव आणि गांडुळे मोठ्या प्रमाणात आढळतात. पावसामुळे हा थर जर वाहून गेला असेल तर उंच भागातील दुसऱ्यांच्या शेतातील माती किंवा वड, पिंपळ किंवा उंबर या झाडांखालची मातीसुद्धा पिकासाठी वापरण्यायोग्य असते असे संशोधनातून सिद्ध झाले आहे.

याच सोबत साखर कारखान्यातून बाहेर पडणारा प्रेसमड हा पदार्थसुद्धा उपयोगी ठरतो. प्रेसमड हा वजनाने हलका, मऊ, चोथायुक्त, गडद, काळसर भुरक्या रंगाचा पदार्थ असून यामध्ये प्रथिने, मेण,



चुना, गंधक, सुक्रोज आणि बग्यासचे धागे, क्षार व मातीच्या कणांचा समावेश असतो. त्यामुळे मातीची सुपीकतेसाठी प्रेसमडचा वापरही करता येतो.

मातीचे स्त्रोत :नदीकाठची माती म्हणजेच गाळाची माती: ही माती हलकी, ओलावा धरून ठेवणारी आणि सेंद्रिय घटकांनी भरपूर असते. ही माती भाजीपाला, फळभाज्या आणि डाळीच्या पिकांसाठी उपयुक्त असते. तलाव किंवा नाल्याच्या गाळातील मातीसुध्दा शेतात भर घालण्यासाठी उपयुक्त असते. या मातीमध्ये सेंद्रिय पदार्थ व सूक्ष्म पोषकद्रव्ये भरपूर असतात. मात्र, ही माती आणताना तिच्यामध्ये प्लास्टिक, धातू किंवा रासायनिक कचरा नसावा याची काळजी घ्यावी. तुमच्या शेताच्या शेजारील उंच भागातील माती थोड्या प्रमाणात आणल्यास ती चांगला पोत आणि पोषणद्रव्ये देते. तसेच वड, पिंपळ, उंबर या झाडांच्या खालची मातीसुद्धा वापरता येऊ शकते. त्यामध्ये सूक्ष्मजीवजंतुचे व अन्नद्रव्यांचे प्रमाण अधिक असते. धरण, शेततळे, पाणथळ जागा याठिकाणी साचलेली माती चांगली सुपीक असते. ही माती शेतीसाठी उत्कृष्ट असते, कारण ती ओलावा धरून ठेवते आणि जमीनसुद्धा सैल ठेवते. शेतीसाठी मातीची निवड करताना मातीचा पोत, रंग, सेंद्रिय घटकांचे प्रमाण महत्त्वाचे ठरते.

मातीचा पोत :मध्यम ते भारी, म्हणजेच गाळमिश्र चिकणमाती शेतीसाठी सर्वोत्तम मानली जाते. फार हलकी किंवा वाळू गोटे असलेली माती पिकासाठी टाळावी.

मातीचा रंग :काळसर किंवा गडद तपकिरी रंगाची माती सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असते. फिकट किंवा पांढुरकी मातीमध्ये पोषकद्रव्ये कमी असतात. तसेच या मातीच्या प्रकारानुसार पिकांची लागवड करावी.सेंद्रिय घटकांचे प्रमाण :माती आणल्यानंतर शेणखत, कंपोस्ट किंवा गांडूळखत मिसळावे, जेणेकरून तिची सुपिकता वाढेल आणि सूक्ष्मजीवजंतुंचा संचार वाढेल.

मातीची तपासणी : मातीमध्ये प्लास्टिक, रासायनिक अवशेष किंवा विटांचे तुकडे नसावेत. तसेच माती आणण्यापूर्वी शक्य असल्यास तिच्यातील पोषकद्रव्ये आणि सामू तपासणी नक्की करावी. जवळच्या कृषी प्रयोगशाळेत चाचणी करून घ्यावी.

चांगले आरोग्य असलेली जमीनीची गुणधर्म :या जमिनीचा सामू ६.५० ते ७.५० च्या दरम्यान असावा. क्षारांचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त नसावे. सेंद्रिय कर्ब एक टक्क्यापेक्षा जास्त असावे. पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी. भरपूर जीवाणूंनी युक्त जसे गांडूळ असलेली जमीन असावी.

माती भरल्यानंतरची काळजी : माती भरल्यानंतर एक- दोन महिन्यांपर्यंत ओलावा टिकवून ठेवावा जेणेकरुन ती बसून स्थिर होईल. शेतामध्ये शेणखत किंवा कंपोस्ट मिसळून हलकी मशागत करुन घ्यावी. मातीचा पोत सुधारण्यासाठी हरभरा, मूग, उडीद यांसारखी हरितखत पिके घ्यावीत जेणेकरुन मातीमधील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते.




### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्मिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.

cmyk




राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.१६ ऑक्टोबर २०२५ ५




# विपरीत वातावरणीय बदलांना विविध गोष्टी कारणीभूत; सकारात्मक बदलांची नितांत गरज - मयंक गांधी

## पत्रकार परिषद घेऊन ग्लोबल विकास ट्रस्टकडून श्वेतपत्रिकेचे विमोचन

परळी । प्रतिनिधी

मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने जागतिक तापमानात वाढ झाली असल्याने विपरीत पर्यावरणीय बदल दिसून येत आहेत. मराठवाडा किंवा अनेक भागांमध्ये झालेली अतिवृष्टी किंवा पावसाची अनियमितता याला अनेक गोष्टी कारणीभूत असून, या सर्व बाबींचा अंतर्भाव असलेली श्वेतपत्रिका ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने प्रकाशित करण्यात आली. सिरसाळा येथील कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे बुधवार (१५) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेस जलनायक मयंक गांधी यांनी संबोधित केले. यावेळी डॉ.हरिश्चंद्र वंगे यांच्यासह भूगर्भ शास्त्रज्ञ देवेंद्र जोशी यांची उपस्थिती होती.

यू.एन.डी.आर.आर, आराईझ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, तृप्त धारा निर्मल आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ''मराठवाडा अतिवृष्टी श्वेतपत्रिका - आपत्तीचे विश्लेषण आणि भविष्यकालीन उपाययोजना'' ही पत्रिका जाहीर



करण्यात आली. याबाबत घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, पर्यावरणीय बदलांचा समतोल बदलत गेल्याने पावसाची अनियमितता तसेच अतिवृष्टीसाखे आपत्तीचे प्रसंग सतत ओढवत आहेत. यंदाच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीने मराठवाड्याला बेचिराख केले, मोठ्या प्रमाणावर हानी झाली. असा प्रसंग पहिल्यांदाच घडतोय असे नाही तर यापूर्वीही अनेकवेळा घडले आहेत. त्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत असून मुख्यतः वृक्षतोड, जागतिक तापमानवाढ, पावसाचे असमान वाटप आणि जलसंधारणाच्या कामांचा अभाव अशा प्रमुख कारणांचा समावेश आहे. भौगोलिक परिस्थितीही कारणीभूत असून अनेकवेळा त्यामुळेही पूरपरिस्थिती निर्माण होते. हे भविष्यात घडू नये याच्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व्हायला हवी, जलसंधारणाची कामे होणे गरजेचे असल्याचे मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

पत्रकारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सिरसाळा येथील जागतिक दर्जाचे कृषिकुल पाहता यावे यासाठी दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी १२ ते ०३ दरम्यान आयोजित कार्यमात सहभागी झालेल्या पत्रकार कुटुंबियांनी कृषिकुल येथे असलेल्या सर्व उपलब्ध सोयी - सुविधांची पाहणी केली. माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण कक्ष, देवराई, यंत्रसामुग्री कक्ष, गोशाळा तसेच विविध प्रकारच्या फळबाग प्लॉटची पाहणी केली व कृषिकुल परिसरात उभारण्यात आलेल्या कृषी महादेव मंदिरातील प्रभूंचे दर्शन घेतला. सर्वांनी एकमेकांना दीपावली निमित्त शुभेच्छांची आदान - प्रदान केली. सिरसाळा व परळी वैजनाथ येथील सर्व पत्रकारांची कुटुंबीयांसह उपस्थिती होती.

# जिल्हा पाणी स्वच्छता मिशन समितीची बैठक संपन्न



जालना। प्रतिनिधी

नागरिकांसाठी पाणी पूरवठा हा महत्वाचा विषय असून, जिल्ह्याकरीता जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली पाणी पूरवठ्याची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षेत आज जिल्हा पाणी स्वच्छता मिशन समितीद्वारे आयोजित जल जीवन मिशनच्या आढावा बैठकीती मैत्रेवार बोलत होत्या. यावेळी जिप ग्रामीण पाणी पूरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणाचे सहायक भूविज्ञानिक श्री. गिरीधरा, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील तालूका उप अभियंता आदींची उपस्थिती होती. जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि जालना या तालूक्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पूरवठा योजनेची कामे मंजूर झालेली आहे. तर उर्वरीत परतूर व मंठा तालूक्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे २ ग्रीड पाणी पूरवठा योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्याकरीता जलजीवन मिशन अंतर्गत ७४५ योजना मंजूर असून, याकरीता ५२४.३१ कोटी रुपयांच्या आराखड्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. या योजना पैकी २५८ योजनाचे १०० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. तर ३१९ योजना या पूर्णत्वाच्या टप्प्यात असून, उर्वरीत १६४ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. जल जीवन मिशन योजनांच्या कामांसाठी राज्य व केंद्र शासनाकडून २१५ कोटी निधी प्राप्त झाला असून, हा सर्व निधी खर्च झाला आहे. तसेच झालेल्या कामाचे देयके अदा करण्यासाठी शासनाकडे १०४ कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आल्याची माहिति देण्यात आली.

# गोशाळांमधून जनावरांचे वाटप सुरु !

## पुरामध्ये पशूधन वाहून गेलेल्या पशुपालकांना दिलासा



लातूर । प्रतिनिधी

अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यात अनेक पशुपालकांचे मौल्यवान पशुधन मृत झाले आहे. या नैसर्गिक आ-पत्तीमुळे पशुपालकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला असून, त्यांना दिलासा देण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने एक अभिनव व संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे. पूर परिस्थितीत गमाविलेल्या पशुधनाच्या बदल्यात या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विविध गोशाळांमधील गायी, बैल, कालवडी व गोऱ्हे हे पशुपालकांना देण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आ-पत्तीग्रस्त पशुपालकांना पुन्हा एकदा उत्पादनक्षम पशुधन उपलब्ध करून देऊन त्यांचे आर्थिक पुनर्वसन करणे, हा उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत उदगीर तालुक्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना सोमनाथपूर येथील श्री गोरक्षण गोशाळेमार्फत एकूण १६ पशुधनांचे वाटप करण्यात आले आहे. हा उपक्रम जिल्ह्यातील इतर गोशाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. पूरग्रस्त पशुपालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

आपले पशुधन गमाविलेल्या पूरग्रस्त भागातील पशुपालकांनी आपल्या संबंधित पशुवैद्यकीय संस्थेशी संपर्क साधावा. पात्र पशुपालकांची यादी तयार करून त्यांची पडताळणी केल्यानंतर जवळच्या गोशाळांशी समन्वय साधून जनावरांचे वाटप केले जात असल्याचे पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील सर्व गोश-ाळांनी आपल्या संस्थेत उपलब्ध असलेल्या निरोगी गायी-बैलांची माहिती पशुसंवर्धन विभागास द्यावी, जेणेकरून अशा आपत्तीग्रस्त पशुपालकांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभघेण्यासाठी संबंधित पशुवैद्यकीय दवाखाना, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय किंवा तालुका पशुधन विकास अधिकारी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# निरंतर वाचनाने विचारांना गती मिळते-डॉ.बाहेगव्हाणकर

बीड। प्रतिनिधी

सध्याच्या धकाधकीच्या युगात वाचन आवश्यक आहे.वाचनाने विचारांना गती मिळते असे प्रतिपादन स्वा. सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले.येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर रोजीचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी राष्ट्रपती जेष्ठ वैज्ञानिक डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी एपीजे अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या पुस्तकांविषयी माहिती दिली.याप्रसंगी बोलताना उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञान संस्कृती वाढवणे या उद्देशाने हा दिवस साजरा करण्याचे ठरवले आहे. डॉ. अब्दुल कलाम यांनी आयुष्यभर ज्ञान आणि शिक्षणाचे महत्त्व जाणले आणि ते शेवटपर्यंत ज्ञानसाधनेत मग्न होते. त्यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लावावी आणि आजीवन शिकण्याची वृत्ती विकसित व्हावी, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. निरंतर वाचनाने विचारांना गती मिळते यातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो,असे ते म्हणाले.

# संभाजीनगर आगाराकडून दिवाळीनिमित्त विविध मार्गांवर जादा बससेवा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कामानिमित्त शहराबाहेर किंवा शहरात असणारे चाकरमाने दिवाळीत आपापल्या गावी जातात. यादरम्यान होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने विविध मार्गांवर जादा बससेवा देण्याचे नियोजन केले आहे. या काळात छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्वच आगारांतून १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत सुमारे ३२ जादा बस सेवा देण्यात येणार असल्याची माहिती विभागीय वाहतूक अधिकारी संतोष घाणे यांनी दिली.

शाळेतील परीक्षांचा बुधवार (दि. १५) हा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे बाहेगावी जाण्यासाठी आजपासूनच विविध मार्गांवर प्रवाशांची गर्दी वाढणार आहे. दिवाळीनिमित्त तर यात मोठ्या प्रमाणात वाढ होते. ही बाब आजपासून दिवाळीनिमित्त जादा बससेवा लक्षात घेऊन लांब पल्ल्याच्या आणि गर्दी असलेल्या मार्गांवर बुधवारपासून जादा बससेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्वच आगारांतून ही सेवा देण्यात येणार आहे.



यात नागपूर, अकोला, लातूर, पुणे, बुलढाणा, जळगाव, भुसावळ, नाशिक, धुळे, शिर्डी, आदी मार्गांचा समावेश आहे.

चिंचवड येथील विविध कंपन्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर येथील तरुण मोठ्या प्रमाणात नोकरी करत आहेत. त्यांच्या सुविधेसाठी १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान २० जादा बसचे नियोजन करण्यात आले आहे. यात कमी किंवा परस्थितीनुसार वाढही होण्याची शक्यता आहे. या २० बस नियमित बसच्या व्यतिरिक्त सेवा देण्यासाठी तयार ठेवण्यात आल्याचीही माहिती घाणे यांनी दिली. दिवाळीनिमित्त धावणाऱ्या या बसना कोणत्या आगारांतून कोणत्या मार्गावर सोडायाचे आणि त्या बसने किती किलोमीटर अंतरापर्यंत सेवा द्यायची याचे नियोजन करण्यात आले आहे. या ३२ बस दिवाळीदरम्यान सुमारे १४ हजार ५३८ किलोमीटरच्या अंतरापर्यंत प्रवाशांना सेवा देणार आहेत.

# बँकेच्या शिपायानेच मारला अडीच कोटींच्या ऐवजावर डल्ला

धाराशिव । प्रतिनिधी

तुळजापूर येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये ऑगस्ट महिन्यात झालेल्या चोरीचा अखेर छडा लागला आहे. या गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने संस्थेच्याच एका शिपायास अटक करून त्याच्याकडून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण २ कोटी १३ लाख १९ हजार ७०३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तुळजापूर पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल होता लोकमंगल मल्टीस्टेट या बँकेतून ३४,६०,८६० रुपये रोख आणि २ किलो ७२२ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची तक्रार दिली होती. याबाबत गुन्हेगाराने कोणतेही पुरावे मागे राहणार नाहीत याची काळजी घेतल्याने तपास करण्यात पोलिसांना अडथळे येत होते यातील आरोपी हा शिपाई असला तरी त्याने यूपीएससी सारख्या परीक्षेची तयारी केली होती.



त्याने ही चोरी करताना एकही पुरावा मागे राहणार नाही याची काळजी घेतली होती. गुन्हा करण्यापूर्वी दोन महिने त्याने स्वतःचा मोबाईलही वापरला नव्हता. बँकेत आलेल्या एका आधार कार्डचा वापर करून त्याने त्या नावानेच नवीन सिम कार्ड घेतले होते. परिणामी या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना अडथळे आले होते. अखेर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्ज पवार यांनी या गुन्ह्याचा तपास कौशल्याने करत नागपूर येथे दडून बसलेल्या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संस्थेतील शिपाई दत्ता नागनाथ कांबळे याला नागपूर येथून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

तपासणीदरम्यान, आरोपीने गुन्हा कबूल केला आणि लपवलेला ११ लाख रुपये रोख व २ किलो १५९ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण २ कोटी १३ लाख १९ हजार ७०३ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. यावेळी त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून यासाठी त्यांना बक्षीस ही देणार असल्याचे जाहीर केले.


# नांदेड जिल्ह्यात दोन वर्षांत ४३७९ जणांना कुणबी मराठा प्रमाणपत्रे!

## नवप्रमाणपत्रधारक आता ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढविण्यासाठी सज्ज?

नांदेड । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनातून मराठा आरक्षण आंदोलकांच्या वेगवेगळ्या मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या. त्यांची विविध स्तरांवर अंमलबजावणी होत असून, गेल्या दोन वर्षांत नांदेड जिल्ह्यामध्ये ४ हजार ३७९ मराठा - कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप जिल्ह्यातील वेगवेगळ्या उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले.

१९६७ पूर्वीचे अभिलेख तपासून त्यांतील कुणबी नोंदी शोधण्यासाठी राज्यभर एक अभियान राबविण्यात आले. त्यानुसार नांदेड जिल्ह्यामध्ये १७५० नोंदी सापडल्या. या नोंदीआधारे संबंधितांना २४ ऑक्टोबर २०२३ पासून प्रमाणपत्रे देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यास आता दोन वर्षे होत आलेली असताना जिल्ह्यात वाटप झालेल्या प्रमाणपत्रांची संख्या ४ हजार ३०० च्या पुढे गेली असून असे काही नवप्रमाणपत्रधारक आता ओबीसी प्रवर्गातून स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्यासाठी सज्ज होत आहेत. जिल्ह्यात




सर्वाधिक प्रमाणपत्रांचे वाटप उपविभागीय अधिकारी कंधार (१९४३) यांच्या कार्यालयामार्फत झाले. त्याखालोखाल किनवट (७८२), बिलोली (६३५) आणि हदगाव (४८८), देगलूर (२२५) या उपविभागांचा समावेश आहे. भोकर उपविभागातून केवळ ६७, धर्माबाद-१३४ तर नांदेड उपविभागातून १०५ प्रमाणपत्रे देण्यात आली. केवळ ८ अर्ज नामंजूर झाले. आता एकही अर्ज प्रलंबित नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित विभागाकडून सांगण्यात आले.

मराठा आंदोलकांची वरील मागणी मंजूर झाल्यानंतर ५८ लाख नोंदी सापडल्या होत्या. त्यानंतर हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन प्रमाणपत्र देण्याचा निर्णय गेल्या महिन्यात २ सप्टेंबर रोजी घेण्यात आला. शासनाने जाहीर केलेल्या कार्यपद्धतीनुसार जिल्ह्याच्या अकरा तालुक्यांमध्ये गावपातळीवरील समिती सदस्यांचे प्रशिक्षण पार पाडण्यात आले; परंतु गेल्या दीड महिन्यात वरील शासन निर्णयानुसार जिल्ह्यामध्ये कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी एकही अर्ज आलेला नाही. मराठा आरक्षण आंदोलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्या आंदोलक कार्यकर्त्यांच्या वारसास आर्थिक मदत व नोकरी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात मृत पावलेल्या ३२ आंदोलकांच्या वारसांना अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले. मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना नोकरी देण्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे. आतापर्यंत २९ जणांनी एस.टी. महामंडळाकडे नोकरीसाठी अर्ज, कागदपत्रे दाखल केली असून त्यातील दोन जणांना सेवेमध्ये रुजू करून घेण्यात आले. २७ अर्ज प्रलंबित आहेत तर तीन वारसांकडून अर्जच आलेले नाहीत.

# गणेश काकडे भाजपवासी

## जिंतूरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर मोठा बदल




परभणी । प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीतील सक्रिय असलेले जिंतूर तालुक्यातील युवा नेतृत्व गणेश गुलाबराव काकडे यांनी नुकताच भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री नामदार मेघनादिदी बोर्डीकर यांच्या हस्ते हा प्रवेश पार पडला.

ज्येष्ठ नेते रामप्रसाद बोर्डीकर, अविनाश भाऊ काळे, भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेशराव भुमरे, भाजपा तालुका अध्यक्ष गोविंद मामा थिटे, नानासाहेब राऊत, राजेंद्रजी नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली काकडे यांनी भाजपमध्ये प्रवेश घेतला. या प्रवेशामुळे पक्षकार्याला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नामदार सौ. मेघनादिदी बोर्डीकर यांच्या कार्यपद्धतीला व विचारांना प्रभावित होऊन त्यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. समाजकार्याच्या विकासाचा हा प्रवास आता नव्या ऊर्जेने आणि नव्या संघटनशक्तीच्या साथीने सुरू होईल, अशा भावना त्यांनी प्रवेशादरम्यान व्यक्त केल्या.

दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना, भाजपमध्ये अन्य पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रवेश घेत आहेत. सध्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये इन्कमिंग जोमात सुरू असल्याने, एकूणच भाजपला मोठी बळकटी मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# बीड न.प. निवडणुक ताकदीने लढवणार -जिल्हाप्रमुख वरेकर

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज आगामी होऊ घातलेल्या न.प. निवडणुकीच्या अनुषंगाने बीड शहरातील शिवसेना इच्छुक उमेदवार व शिवसैनिक यांची व्यापक आढावा बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स येथे शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , शेख बिलाल भाई, मुकेश भैय्या घुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत



घेण्यात आली.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की महाराष्ट्रामध्ये न.प. च्या निवडणुकीचे बिगुल वाजले असुन बीड न.प.ची निवडणुक होणार आहे.पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार सर्व प्रभागांमध्ये आपल्याला तयारी करून ठेवायची आहे, शेवटी महाविकास आघाडीस पक्षाचे जसे आदेश निघतील तसे आदेश पाळायचे आहेत आज आपल्या या पुर्वतयारी आढावा बैठकीसाठी शहरातील सर्व प्रभातून सर्व समाजांच्या लोकांची मोठी उपस्थिती बघून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शहरातील ताकद दिसून येत आहे, इच्छुकांची संख्याही जास्त असल्याने आपण वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून मार्ग काढला जाईल स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये महाविकास अघाडी झाल्यास जास्तीत जास्त जागा आपल्याला सोडून घेतल्या जातील, यावेळी बानो महेबुब पठाण , शेख आलमा ताहेर , सय्यद शबाना नहीम ,इरफाना ◀◀ पान २ वर

# रखडलेल्या पीक कर्जासाठी चौसाळा येथील स्टेट बँकेच्या शाखेसमोर आमरण उपोषणाचा इशारा

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखेमध्ये चौसाळा परिसरातील शेतकऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून खरीपाच्या पिकासाठी पीक कर्जाची मागणी केलेली आहे. परंतु सध्या खरिपाच्या पिकांची काढणी झाली तरी शेकडो शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळालेले नसून पीक कर्जासाठी टाळाटाळ सुरू आहे. त्यामुळे अद्याप पर्यंत शेकडो शेतकरी पीक कर्जापासून वंचित आहेत. तसेच बँकेच्या मनमानी कारभाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी २९ ऑक्टोबर बुधवार रोजी रोजी चौसाळा शाखेसमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे अविनाश उर्फ बाळासाहेब मोरे पाटील यांनी जिल्हाधिकारी बीड, स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा बीड, जिल्हा अग्रणी बँक बीड यांना याबाबत लेखी निवेदन दिले आहे.

पीक कर्जाची मागणी केलेल्या शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत लाभ मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्यात येईल व यावेळी कायदा सुव्यवस्थेचा काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा चौसाळा व क्षेत्रीय कार्यालय बीड यांची राहील असे निवेदन बाळासाहेब मोरे पाटील यांनी दिलेले आहे.

अगोदरच अतिवृष्टीच्या दुष्टचक्रात शेतकरी पूर्णपणे खचलेला असून बँकेच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना बँकेत वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वायाला जात आहेत. तसेच सध्या पिकांच्या काढणीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील कामही बुडत आहे. आता तरी बँक प्रशासनाने मनमानी कारभार थांबवून शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. म्हणजे किमान त्यांना आता रब्बीच्या पेरणीसाठी तरी हे पीक कर्ज उपयोगी येईल असे प्रसार माध्यमांना प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात अविनाश उर्फ बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितले आहे.

# पोलीसांनी तडीपार आरोपी पकडला

बीड । प्रतिनिधी

दिनांक १४ आऑक्टोबर रोजी बीड शहरात आयोजित हिंदू जन आक्रोश मोर्चा या सभेदरम्यान स्टेज परिसरात एक संशयास्पद व्यक्ती फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. सदर व्यक्तीची तपासणी केली असता तो तडीपार असल्याचे निष्पन्न झाले.

अजय अशोक तांदळे (वय २४ वर्षे, रा. कोरेगाव, ता. केज, जि. बीड) असे त्याचे नाव असून, त्याच्यावर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, जबरी लुटमार अशा गंभीर गुन्ह्यांचे विविध गुन्हे दाखल आहेत. तो सध्या तडीपारीचा आदेश लागू असतानाही बीड शहराच्या हद्दीत उपस्थित होता. त्यामुळे त्याने तडीपारी आदेशाचे उल्लंघन केले असल्याने त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ सह कलम ४१ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.सदर आरोपीस ताबडतोब पोलिसांनी पकडून त्याची ओळख व परिस्थितीची खात्री केली. त्यानंतर आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू आहे.सभेदरम्यान कोणतीही अनुचित घटना न घडता कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांच्या तत्पर आणि दक्ष कारवाईबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित पथकाचे कौतुक केले आहे.

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बागायती वर्गवारी नुसार मिळणार नुकसान भरपाई

गेवराई । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता ८,५०० रुपये ऐवजी हंगामी बागायती वर्गवारीनुसार प्रति हेक्टरी १७,००० रुपये प्रमाणे नुकसान भरपाई मिळणार आहे. त्याच बरोबर रब्बी हंगामात खत बी बियाणे खरेदी साठी प्रति हेक्टरी १०,००० रुपये अनुदान शासन देणार आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता २७, ००० रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी या कामी पुढाकार घेऊन थेट मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून कापुस उत्पादक शेतकऱ्यांना मदती बाबतचा



निर्णय घेतला आहे.आ. विजयसिंह पंडित यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्व आमदारांनी या कामी एकजुटीने पाठपुरावा केल्यामुळे अखेर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. महायुतीच्या सरकारने तात्काळ घेतलेल्या या निर्णयामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी सरकारचे आभार मानले आहेत.

बीड जिल्हा तसेच गेवराई तालुक्यात अतिवृष्टी आणि गोदावरी व सिंधफणा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे कापुस व ईतर पिकांचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. परंतु कापुस पिकाला बागायतीचा दर्जा दिला नसल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय झाला होता.अतिवृष्टी आणि महापूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बागायती वर्गवारीनुसार नुकसान भरपाई मिळावी यासाठी राज्याचे कृषिमंत्री, कृषी राज्यमंत्री सन्माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह संबंधितांकडे मागील आठवडाभरा आ. विजयसिंह पंडित ◀◀ पान २ वर



# 'उमेद'च्या दिवाळी फराळ महोत्सवाचे बीडमध्ये उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत उमेदच्या वतीने गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी दिवाळी फराळ महोत्सव व विक्री प्रदर्शनाचे आयोजन दि.१४ ते १८ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा परिषदेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर बचतगटाच्या खाद्य पदार्थाची व वास्तूच्या या विक्री प्रदर्शनात मसाले, विणकाम, लाकडी वस्तु, खाद्य पदार्थ, आदी १३ स्टॉल उभारण्यात आले आहेत. बीड जिल्हा ◀◀ पान २ वर

# जिल्ह्यात काँग्रेस स्वबळावर लढणार -राहुल सोनवणे

बीड । प्रतिनिधी

आगामी होवु घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आज बीड येथे बीड तालुका व शहर काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह बीड या ठिकाणी घेण्यात आली. या बैठकीस काँग्रेसचे बीड विधानसभा निरीक्षक अन्वर देशमुख, दादासाहेब मुंडे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे पाटील, परवेज कुरेशी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी



तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी बीड तालुक्यातील आठ जिल्हा परिषद व सोळा पंचायत समिती गणांचा आढावा व वर्तमान परिस्थितीचा आढावा मांडला त्याच बरोबर शहराध्यक्ष यांनी शहराचा आढावा दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, निरीक्षक अन्वर देशमुख, दादासाहेब मुंडे आदी पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे म्हणाले की, काँग्रेस पक्ष स्वतंत्र विचारधारा असलेला राष्ट्रीय पक्ष असुन सर्व जाती धर्माला सोबत घेऊन काम करणारा देशातील एकमेव पक्ष आहे. देशात राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेस सातत्याने सर्वसामान्यांच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरत आहे. बीड जिल्ह्यात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग असुन अलीकडच्या काळात आघाडीच्या राजकारणात काँग्रेस ◀◀ पान २ वर

# पारनेरच्या आर्टस महाविद्यालयास प्रथम तर बालाजी शिक्षण प्रसारक संस्थेच्या अध्यापक महाविद्यालयास व्दितीय पारितोषिक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वतीने सोमवारी झालेल्या स्व.प्राचार्य भ. कि.सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सांघिक स्वरूपाचे प्रथम पारितोषिक पारनेरच्या आर्टस् महाविद्यालयास तर येथील बालाजी शिक्षण प्रसारक संस्था संचालित अध्यापक महाविद्यालयास व्दितीय पारितोषिक, धर्मापुरीच्या शंकरराव गुट्टे कॉलेजला तृतीय व स्वा.रा.ती. महाविद्यालयास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले तर वैयक्तिक पारितोषिकात प्रथम रायगड येथील पंकज पाडुळे,व्दितीय महेश उशिर,आर्ट,कॉमर्स, सायंन्स कॉलेज पारनेर, तृतीय अनिकेत वणारे, संताजी महाविद्यालय नागपुर व उत्तेजनार्थ आकाश बोडखे ओंकारनाथ मालपाणी



विधी महाविद्यालय संगमनेर यांना देण्यात आले.बक्षीस वितरण प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष जी.बी.व्यास,संस्थेचे सल्लागार एन.के. गोळेगांवकर,एम.एस. लोमटे आदी उपस्थित होते.

प्रा.दुर्गादास चौधरी,अहमदपुर प्रा.मकरंद जोगदंड, परळी, प्रा.अर्चना चव्हाण, घाटनांदुर, प्रा. आशालता होळकर यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. प्रास्तविक प्राचार्य डॉ.पी.एस.देशमुख यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.सविता बुरांडे यांनी करून दिला संचलन प्रा. संपदा कुलकर्णी, ◀◀ पान २ वर

# ओबीसीच्या न्याय हक्कासाठी रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करा -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील गरजवंत मायक्रो ओबीसी बलुतेदार व आलुतेदार असलेल्या समाजाला आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळालेल्या नाहीत. यासाठी जस्टीस रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करा ओबीसीची जात निहाय जनगणना करा या प्रमुख मागणीचे निवेदन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्रा बबनराव आंधळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे देण्यात आले



राज्यघटनेच्या कलम ३४० अंतर्गत राष्ट्रपतीच्या आदेशाने स्थापन झालेल्या जस्टीस रोहिणी आयोगाने २०१९ मध्ये अहवाल पूर्ण केला. तो स्वीकारून अंमलात आणावा अशी मागणी करण्यात आली. त्यामध्ये सरकारने ओबीसीची जात निहाय जनगणना करावी यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे यासाठी शिफारस करावी, ओबीसी प्रवर्गातील काही जाती समूह सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आहेत. त्यामुळे आरक्षणाचे समन्यायी पुनर्विकरण आवश्यक असल्याचे ग्रामीण युवक संघटनेचे म्हणणे आहे. सध्या ओबीसी आरक्षणाच्या २७% मधून दहा ते पंधरा जाती सुमारे ९० टक्के आरक्षणाचा फायदा घेत आहेत. शेकडो लहान जाती मात्र या स्पर्धेत मागे पडलेल्या आहेत. शैक्षणिक, प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात त्यांचा आवाज ऐकू येत नाही म्हणजे संविधानानुसार ओबीसी म्हणून ओळख ◀◀ पान २ वर

# ओबीसी महाएल्गार सभेस परीट - धोबी समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे -जगताप

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या सभेस परीट - धोबी समाजातील बंधू - भगिनींसह युवक, युवती आणि विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन परीट - धोबी सेवा महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप यांनी केले आहे.

शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे ◀◀ पान २ वर

# अंत्यविधी कार्यक्रमात पिकअप घुसला एक मयत, एक गंभीर, अनेक जण जखमी

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पाली येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यविधी सुरू असतानाच भरधाव वेगाने येणारा पिकअप अंत्यविधी कार्यक्रमात घुसल्याने एक जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर असून सात ते आठ जण जखमी झाले आहे. जखमींवर बीड शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.



पाली परिसरातील स्मशान भूमी या ठिकाणी आज (ता. १५) सायंकाळी स्वर्गीय आसराबाई किसनराव नवले यांचा अंत्यविधी सुरू होता. याच दरम्यान भरधाव वेगाने येणारा पिकअपवरील चालकाचे संतुलन सुटल्यामुळे हा पिकअप अंत्यविधी मध्ये घुसला यात संभाजी विठ्ठलराव जाधव (रा. रोळसगाव वय ५०) हे मयत झाले व मसू जगताप करचुंडी वय ४५ वर्ष व आश्रुबा शिंदे हे जखमी असून यांच्यासह आठ ते दहा जण अपघातात जखमी झाले आहेत. यांच्यावर शहरातील विविध रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संघटन नितीन धांडे,राहुल नवले,अनिल साळुंखे,शरद नवले,अतुल नवले,रमेश नवले, तुकाराम धसे यांनी तात्काळ जखमींना रुग्णालयात नेण्यास मदत केली.

# वर्षभर झोप घेणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाला ऐन दिवाळीतच जाग आली ?

जालना । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणासुदीला अन्न व औषध विभागाला कारवाई करण्यासाठी कसं काय जाग येते हे काही वेगळं सांगण्याची गरज नाही कशासाठी कारवाई असती हे सगळ्याला माहित आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाने एका वर्षामध्ये किती कारवाई केल्या याची पण माहिती देणे गरजेचे होते अशी माहिती अद्याप पर्यंत प्राप्त झाली नाही. अशी बातमी प्रसिद्धी करण्याकरता देण्यात येत आहे. सणासुदीच्या काळात अन्नपदार्थांमधील संभाव्य भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे जालना जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सण महाराष्ट्राचा -संकल्प अन्न सुरक्षेचा ही राज्यव्यापी मोहीम अन्न व औषध प्रशासनाकडून ऑगस्ट महिन्यापासून राबविण्यात येत आहे. तरी नागरिकांनी दुध व खव्यापासुन तयार केलेली मिठाई २४ तासाच्या आत सेवन करावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे सहायक आयुक्त निखील कुलकर्णी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.


विशेष तपासणी मोहिमेअंतर्गत जालना शहरासह जिल्ह्यातील खाद्यपदार्थ उत्पादक, घाऊक विक्रेते, वितरक, मिठाई उत्पादक व विक्रेते यासारख्या आस्थापनांच्या तपासण्या करुन एकूण ४१ अन्न नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. सदर नमुन्यामध्ये दूध, खवा, पनीर, तूप, खाद्यतेल, मिठाई आणि सुकामेवा आदी अन्नपदार्थांचे नमुने घेण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरुन खाद्यतेलाचा १३ हजार ८९९ किलोग्रॅम एकुण रुपये २१ लाख २७ हजार ७४२ रुपये किमतीचा साठा नमुने विश्लेषणाकरीता घेऊन जप्त करण्यात आला आहे. या नमुन्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर मोहिम दिवाळीपर्यंत राबविण्यात येणार आहे. तसेच नागरिकांनी परवाना व नोंदणीधारक विक्रेत्याकडुनच खरेदी करावी, मिठाई व नाशवंत अन्न पदार्थांची योग्य तापमानावर साठवणुक करावी. असेही अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कळविले आहे

# गुरु तेग बहादूर यांच्या अशासकीय समितीच्या जिल्हा सदस्यपदी घमंड सिंग सुरज सिंग

परळी । प्रतिनिधि

महाराष्ट्र शासनातर्फे हिंद की चादर गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने समिती गठीत करुन अशासकी सदस्यांची निवड केली जात आहे.यात बीड जिल्हा सदस्यपदी घमंड सिंग सुरज सिंग जुनी निवड करण्यात आली आहे.

गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहादत व त्यागाला आदरांजली वाहण्यासाठी विविध कार्यक्रम, जसे की नगर कीर्तन, कथा आणि किर्तन, यांच नियोजन करण्यासाठी अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली आहे. या साठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन मीटिंग घेण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सदस्य या बैठकीसाठी उपस्थित होते. मुख्य मार्गदर्शक मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष प्रमुख



रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. त्याबरोबरच नांदेड सही नागपुर, मुंबई येथे संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित केले असून देश विदेशातील समाजबांधव कार्यक्रमाला उपस्थिती लावणार आहेत. असल्याची माहिती घमंड सिंग सुरज सिंग जुनी यांनी दिली.

श्री गुरु तेग बहादुर यांचे सन २०२५ हे ३५० व शहीद समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा, तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. "हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार, दि.१६ ऑक्टोबर २०२५ | पान ७

# भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांनी उजळला ज्ञानोत्सव

पिंपरी । प्रतिनिधी

ज्ञान, विज्ञान आणि प्रेरणेचा दीप प्रज्वलित करणारे थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न,माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील, सुप्रसिद्ध कवी अशोक गायकवाड, महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शिक्षक जीवन ढेकळे, योगिता कोथावले, उज्ज्वला साटकर, शर्मिला काराबळे, रविंद्र ओव्हाळ, विशाल रेंगडे, सीमा जाधव, निलेश लांडगे यांच्यासह विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थी, नागरिक यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि डिजिटल युगातही पुस्तकप्रेम वृद्धिंगत व्हावे, या हेतूने 'कविसंमेलन', 'सोशल मीडियाद्वारे वाचनास प्रोत्साहन देणारे संदेश', 'मराठी वाचन कट्टा – डिजिटल वाचनाची नवी दिशा', 'मराठी साहित्याचे डिजिटल प्रसारण' तसेच 'विकिपीडियावर मराठी लेखन वाढविण्यासाठी कार्यशाळा' असे विविध उपक्रम यानिमित्ताने पार पडले,आलेल्या मान्यवरांचे संत गाडगेबाबा यांचे जीवनावर आधारित पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

कवी अशोक गायकवाड यांनी सादर केलेल्या 'परी सारखी दिसायची तू', 'कळे ना कसा हा जगावेगळा मी' अशा विविध भावस्पर्शी कविता उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांचे मार्गदर्शन,कविता





तसेच गझल सादरीकरणाने वातावरणात रसिकतेचा आणि साहित्यप्रेमाचा सुरेल संगम घडून आला. वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा देताना ते म्हणाले की, भारत हा महापुरुषांची खाण आहे. प्रत्येक महापुरुष हा वाचनामुळे घडला आहे. भारतातील वाचन संस्कृती, गायन संस्कृती, लेखन संस्कृतीचे विदेशात देखील अनुकरण केले जाते. प्रत्येकाने साहित्यवाचनास प्राधान्य देणे गरजेचे आहे. वाचनामुळे आपला दृष्टिकोन व्यापक होत असतो, असेही त्यांनी सांगितले. तसेच यावेळी त्यांनी कविता आणि गझल या काव्यप्रकाराची सविस्तर माहिती दिली. 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या गाण्याचे सादरीकरणदेखील त्यांनी केले.

किरण गायकवाड यांनी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनातील विविध उदाहरणांचे दाखले देताना सांगितले की, वाचन म्हणजे केवळ पुस्तकांचे वाचन करणे नव्हे, तर आपल्या आजूबाजूला असणारी माणसेदेखील वाचता आली पाहिजेत. वाचनाची जिज्ञासा ठेवा. स्वतःच्या सामर्थ्याच्या, जिद्दीच्या आणि बुद्धीच्या बळावर यश मिळवण्यासाठी वाचन दिनासारखे उपक्रम उपयोगी ठरतात. वाचनामधून प्रेरणा निर्माण व्हावी, या हेतून आजच्या दिवसाचे आयोजन केले आहे. महापालिका वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये विचारांची देवाणघेवाण वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. वाचनाची प्रेरणा हीच खरी प्रगतीची बीजे आहेत. एखाद्या व्यक्तीला समजून घेण्याची भावना जागृत होण्यासाठी वाचन महत्त्वपूर्ण ठरते, असेही ते म्हणाले.

'प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी नियमित वाचन करणे गरजेचे आहे. वाचन ही केवळ सवय नसून ती व्यक्तिमत्त्व घडविण्याची दिशा आहे. आजच्या डिजिटल युगात माहितीचा अमर्याद साठा उपलब्ध आहे, तथापि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी वाचनासारखा दूसरा प्रभावी मार्ग नाही. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी 'स्वप्न पाहा आणि त्यांना साकार करा' हा संदेश दिला. त्या स्वप्नपूर्तीसाठी वाचन हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्येकाने रोज काही मिनिटे पुस्तकांशी संवाद साधण्याची सवय लावली, तर समाजात विचारशीलता आणि प्रगल्भता वाढेल असे मत प्रफुल्ल पुराणिक यांनी व्यक्त केले त्याचबरोबर त्यांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या दैदीप्यमान कामगिरीबद्दल सविस्तर माहितीही दिली.

यावेळी उज्ज्वला साटकर, जीवन ढेकळे, योगिता कोथावले यांनी विविध कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य शशिकांत पाटील यांनी वाचनाचे महत्त्व, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांची प्रेरणा आणि ज्ञानप्रकाशाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला. सूत्रसंचालन निलेश लांडगे यांनी केले.

जयंती निमित्त उपस्थितांनी घेतलो स्वच्छतेची शपथ

आम्ही अशी प्रतिज्ञा करतो की, भारताच्या भूमीला स्वच्छ ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे वेळ देऊ. आम्ही भारतभूमीच्या स्वच्छतेसाठी आठवड्यातून दोन तास, याप्रमाणे वर्षातील १०० तास उत्स्फूर्तपणे देऊ. आम्ही स्वतः उघड्यावर कचरा टाकणार नाही व इतरांना टाकू देणार नाही. आम्ही आमचा परिवार, आमच्या परिसरातील भाग, आमचे शहर आणि आमच्या कामाचे ठिकाण स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतः प्रयत्नशील राहू व इतरांनाही स्वच्छतेसाठी प्रेरित करू. आज आम्ही घेत असलेली ही प्रतिज्ञा अजून १० नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांना स्वच्छतेबाबत प्रोत्साहित करू. ते देखील भारतमातेच्या स्वच्छतेसाठी वर्षातील आपले १०० तास देतील.आम्हाला पूर्ण विश्वास आहे की स्वच्छतेसाठी आम्ही उचललेले प्रत्येक पाऊल हे भारतमातेचे रुप अधिक स्वच्छ ठेवण्यास हातभार लावेल, अशी स्वच्छतेची शपथ उपस्थितांनी घेतली.प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

परीक्षा केंद्रे व ग्रंथालयांमध्ये विविध उपक्रम

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेअंतर्गत सर्व स्पर्धा परीक्षा केंद्रे व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विविध केंद्रांवर विद्यार्थ्यांसाठी वाचन सत्र, पुस्तक प्रदर्शन तसेच प्रेरणादायी साहित्याचे वाचन या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# पुणे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचीच सुरक्षा रामभरोसे; दीड वर्षे होऊनही फायर सूट मिळेना, माहिती अधिकारातून आलं समोर

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेतील नवनियुक्त कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होऊन दीड वर्षे पूर्ण होऊन सुद्धा अद्याप त्यांना आगीपासून बचाव करण्याचे स्वसंरक्षण साहित्य दिले गेले नाही व काही नवनियुक्त फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांना (ऋळीश लीळसरवश) आग विझवतांना शरीर भाजल्याने गंभीर जखमा झाल्या आहेत अशी धक्कादायक माहिती पुढे आलेली आहे.




पुणे महानगरपालिका (झ्रींपश) अंतर्गत अग्निशामन विभागाचे २३ उपकेंद्रे असून अग्निशमन दलाचे मुख्यालय गंज पेठ,लोहिया नगर,पुणे महानगरपालिकेची भांडार विभाग यांना मानवाधिकार कार्यकर्ते मनिष देशपांडे यांनी माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार अग्निशमन मुख्यालय व उपकेंद्रांमध्ये २०२४ साली नव्याने नियुक्त झालेल्या अग्निशामक विमोचक/फायरमन हे तब्बल १६७ कर्मचारी आहेत. तसेच या नवनियुक्त कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होऊन दीड वर्षे पूर्ण होऊन सुद्धा अद्याप गणवेश व स्व संरक्षण साहित्य दिले गेले नाही.विशेष बाब म्हणजे या कर्मचाऱ्यांना फायर सुट म्हणजेच आगीपासून बचाव करणारे स्वसुरक्षा साहित्य सुद्धा दिले नसल्याची धक्कादायक त्यांनी केलेला तक्रारीतून आणि माहिती माहितीच्या अधिकारातून समोर आली आहे.

अग्निशमन विभागाच्या या कर्मचाऱ्यांना फायर सुट म्हणजेच आगीपासून बचाव करणारे स्वसुरक्षा साहित्य न देणे म्हणजे त्यांचा जीव जोखिमेत टाकणे व त्यांच्या प्रती महापालिकेने आसवेंदनशीलता दाखविणे असल्याचे एड. असीम सरोदे यांनी म्हटलं आहे. याबाबत जन आंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाचे कार्यकर्ते मनीष देशपांडे यांनी आयुक्त पुणे महानगरपालिका आणि मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांना तक्रार केली होती. तसेच पुणे महानगरपालिका कामगार युनियन याचे अध्यक्ष उदय भट यांना सुद्धा लेखी पत्र देऊन लक्ष देण्याची विनंती केली होती पण कुणीही या विषयाबाबत गंभीरता दाखविलेली नाही. दिवाळीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात आगी लागण्याच्या घटना घडतात आणि अश्यावेळी महापालिकेची अनास्था फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतणारी असू शकते अशी चिंता अँड. असीम सरोदे यांनी व्यक्त केली आहे. अतिदक्षता व अत्यावश्यक सेवेत असलेला हा विभाग प्रशासकीय प्रक्रिया आणि कागदपत्रांमध्ये अडकलेला आहे. अत्यावश्यक सेवा असलेल्या विभागामध्ये त्यांच्या संदर्भात असलेल्या समस्या विषयी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनीच नव्हे तर मुख्यमंत्री महोदय यांनी सुद्धा धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे असे मत कायदेतज्ञ असीम सरोदे यांनी व्यक्त केले. कोंढवा परिसर उंड्री येथे नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेमध्ये घरगुती गॅस सिलेंडर चा स्फोट होऊन अग्निशमन दलातील नवनियुक्त फायरमन जवान विश्वजीत वाघ व पृथ्वीराज खेडकर हे दोन जवान स्वसुरक्षा साहित्य म्हणजेच फायर सुट नसल्यामुळे गंभीर भाजले गेले होते. तरीही अद्याप नवनियुक्त फायरमन जवानांना गणवेश आणि फायर सुट दिले गेलेले नसून या मानवी हक्क उल्लंघन समस्या बाबत उच्च न्यायालयात दाद मागितली जाईल, असे एड. श्रीया आवले यांनी सांगितले.



# तारीख पर तारीख..! न्याय न मिळाल्याच्या नैराश्यातून जेष्ठ नागरिकाची आत्महत्या

पुणे : न्याय मिळत नसल्याच्या नैराश्यातून ६१ वर्षीय जेष्ठ नागरिकाने बुधवारी (दि.१५) सकाळी शिवाजीनगर न्यायालयाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. या धक्कादायक घटनेमुळे न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली.

नामदेव यशवंत जाधव (वय ६१, रा. वडकी, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. १९९७ सालापासून जमीनविषयक वाद सुरू होता. तेव्हापासून आजवर ही केस न्यायप्रविष्ट होती, मात्र दीर्घकाळ न्यायालयीन प्रक्रिया सुरू असूनही त्यात त्यांना यश आले नव्हते. त्यामुळे ते तणावाखाली होते. त्यातून त्यांनी हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मिळाली.बुधवारी (दि.१५) सकाळी नामदेव जाधव हे शिवाजीनगर येथील न्यायालयात आले. न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जाऊन त्यांनी उडी मारली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांच्यासह पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने जाधव यांना ससून रुग्णालयात उपचारासाठी हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे न्यायालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. घटनेचा पंचनामा करण्यात आला असून, शिवाजीनगर पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे. शिवाजीनगर पोलीस पुढील तपास करीत आहेत.


# गाव विकासासाठी समविचारी सरकार हवे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील

पारगाव शिंगवे । प्रतिनिधी

देशात व राज्यात आपल्याच विचाराचे सरकार असून गावच्या विकास कामासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार निवडून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.



आंबेगाव तालुक्यातील पारगाव, शिंगवे, लाखणगाव, पोंदेवाडी, देवगाव, वाळुंजनगर आदी गावात गावभेट दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पारगाव येथे झालेल्या कार्यक्रमात दिलीप वळसे पाटील बोलत होते. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील,अरुण गिरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विष्णू काका हिंगे, भीमाशंकर कारखान्याचे संचालक नितीन वाव्हळ, बाजार समितीचे संचालक शिवाजीराव ढोबळे,शरद बँकेचे संचालक दौलतराव लोखंडे, माऊली अस्वारे, बाजार समितीचे सभापती निलेश थोरात ,उपसभापती सचिन पानसरे, राष्ट्रवादी युवकचे तालुका अध्यक्ष वैभव उंडे, भगवान वाघ, रवींद्र करंजखिले, माजी सरपंच अनिल वाळुंज, शैलेजा ढोबळे, बबनराव ढोबळे, विरेंद्र ढोबळे, तसेच सुदाम वाव्हळ, बारकूशेठ जगताप, संतोष वाव्हळ, शुभम चांगण, सतीश रोडे, मनोज ढोबळे, शिरीष कुमार रोडे,काळूराम लोखंडे आदी मान्यवर व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. निलेश पडवळ यांनी सूत्रसंचालन केले,



# चाकण परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट

चाकण : चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. अवघ्या २४ तासांत ३०० मीटरच्या अंतरात दोन मोठ्या घरफोड्या आणि चार चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. शेलगाव, भोसे, रासे, वडगाव घेणंद व शेलपिंपळगाव परिसरातील घरांवर चोरट्यांनी मध्यरात्रीपासून ते भरदिवसा धाड टाकून सुमारे ३५ ते ४० तोळे सोने चांदीचे दागिने, लाखो रुपयांची रोकड आणि मौल्यवान साहित्य लंपास केले. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास शेलगाव येथील श्री. दत्त हायटेक नर्सरी, विजयानंद आवटे यांचे किराणा दुकान आणि भगवान झरेकर यांच्या घरावर चोरट्यांनी मोठा हात मारला. त्यानंतर मंगळवारी भरदुपारी दोनच्या सुमारास श्री. लोणारी यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी मौल्यवान दागिने आणि रोकड घेऊन पोबारा केलाय. सलग घडणाऱ्या या घटनांनी पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. चोरटे मोकाट फिरत असताना पोलिस मात्र केवळ पंचनाम्यापुरते मर्यादित असल्याची तीव्र नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे. परिसरात गस्त वाढवून चोरट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# बालभारती ते पौड फाटा रस्त्याचा मार्ग मोकळा; सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती उठवली

**पुणे । प्रतिनिधी**

बालभारती ते पौड फाटा रस्त्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतची स्थगिती उठवली असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. बालभारती पौड रस्त्याला जोडणाऱ्या वेताळ टेकडीवरून जाणाऱ्या रस्त्याला महापालिकेने पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि.१५) रोजी दिले आहेत.



बालभारती ते पौड रस्त्यादरम्यानचा सुमारे दोन ते सव्वादोन किलोमीटरचा रस्ता भांडारकर संस्थेजवळील टेकडीवरून जाणाऱ्या रस्त्याला आक्षेप घेत काही सामाजिक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई आणि विनोद चंद्र यांच्या खंडपीठांसमोर सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने या रस्त्याबाबतची स्थगिती उठवली आहे.डॉ. सुषमा दाते आणि आयएलएस विधी महाविद्यालय या प्रकरणी न्यायालयात गेले होते. तर महापालिकेच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, अँड. अभिजीत कुलकर्णी, अँड. राहुल गर्ग, अँड. धवल मल्होत्रा आणि अँड. निशा चव्हाण यांनी काम पाहिले. शिवाजीनगर आणि कोथरूड परिसरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी पर्यायी मार्ग असलेल्या या रस्त्याला पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या विरोधामुळे काही वर्षांपासून विरोध होत होता.

सामाजिक संघटनांनी विरोध केल्यामुळे प्रकल्पाचा खर्च देखील काही पटीत वाढल्याची मांडणी महालिकेच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर महापालिकेने पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी आणि त्यानंतर काम करावे असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

# चिमुकल्यांचा जीव गेलाय अन् मुख्यमंत्री कबुतरांसाठी वेळ काढतात -डॉ. कोल्हे

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुका व जुन्नर परिसरात गेल्या दहा दिवसांत बिबट्याच्या हल्ल्यांमुळे दोन निरागस चिमुकल्यांचा जीव जाण्याची दुर्दैवी घटना घडली आहे. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे पाच वर्षांची शिवन्या बोंबे हिचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला, तर काही दिवसांपूर्वी जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथेही अशाच घटनेत आणखी एका चिमुकल्याचा बळी गेला. या घटनांनी संपूर्ण परिसरात भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरखेड येथे भेट देऊन मयत शिवन्या बोंबेच्या कुटुंबाचे सांत्वन केले.



यावेळी ते म्हणाले, दहा दिवसांत दोन लेकरांचे जीव गेले, ही दुर्दैवी बाब आहे. उपाययोजनेसाठी वारंवार पत्रव्यवहार करूनही मुख्यमंत्री कृती आराखड्यासाठी वेळ देऊ शकत नाहीत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना कबुतरांसाठी वेळ आहे, पण आमच्या लेकरांसाठी वेळ नाही, हे अत्यंत खेदजनक आहे. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस आणि वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्याकडून घटनेची माहिती घेत खासदार कोल्हे यांनी तातडीने बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या. स्मिता राजहंस यांनी पिंजऱ्यांची संख्या कमी असल्याने अडचणी येत आहेत असे सांगितले असता, कोल्हे म्हणाले, एका चिमुकल्याचा जीव जाणे ही फार मोठी हानी आहे. ही भरून निघू शकत नाही. या संदर्भात पालकमंत्र्यांसोबत लवकरच बैठक असून, मी स्वतः त्यात उपस्थित राहणार आहे. उपाययोजनेसाठी तुम्हाला जे काही आवश्यक आहे ते निर्भीडपणे मांडा.दरम्यान, ग्रामस्थांनी वनविभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. आमचा जीव महत्त्वाचा की बिबट्याचा? आमच्या लेकरांचं संरक्षण झालं पाहिजे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.या भागातील गावकरी बेल्हे–जेजुरी राज्य मार्गावर येत्या गुरूवारी (दि. १६) मोठ्या जनआंदोलनाची हाक देणार आहेत. या आंदोलनाचा इशारा प्रफुल्ल बोंबे यांनी डॉ. अमोल कोल्हे, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे आणि मंचर बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम यांच्या उपस्थितीत दिला. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर दुःख, राग आणि असुरक्षिततेची भावना स्पष्ट दिसत होती.

# अजित दादाच्या जनसंवाद कार्यक्रमात पोलिसांची अरेरावी

पुणे ।

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा १५ ऑक्टोबर रोजी पुण्यात जनसंवाद कार्यक्रम या कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना पोलिसांनी मात्र अरे रवी केल्याची दिसून आले पोलिसांकडून पत्रकारांना अडवण्याचाही प्रयत्न झाला या संदर्भात आता उपमुख्यमंत्र्यांनीच पोलिसांना समज देण्याची गरज असल्याचे दिसत आहे

आज दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील रहाटणी येथे थोपटे लॉन्स मध्ये उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमांमध्ये सामान्य नागरिक अनेक समस्या घेऊन येत असल्याचे दिसून आले परंतु तिथे सामान्य नागरिकांना पोलीस प्रशासन मुजुरपणा करत असल्याचे दिसले इंट्री गेट पासून ते दादांच्या स्टेजपर्यंत पोलीस बंदोबस्त होता तेव्हा तिथे दैनिक राज्य लोकतंत् चे प्रतिनिधी वार्तांकन करत असताना काळेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी मुजरपणा केल्याचे दिसून आले आम्ही तुम्हाला व्हिडिओ करू देत आहोत हीच मेहरबानी समजावी असे पोलीस कर्मचारी म्हणत असल्याचे व्हिडिओ मध्ये ऐकायला मिळत आहे वार्तांकन पत्रकारांनी करावी की नाही हा प्रश्न पडतो दादा आपण पोलीस प्रशासनाला पाठीशी घालत आहात का घालता असे म्हणणे सुद्धा वावगे ठरणार नाही सामान्य नागरिक समस्या घेऊन येतो तेव्हा आपल्या प्रोटोकॉल प्रमाणे त्याची चौकशी झाली पाहिजे परंतु तेथे सामान्य नागरिकांना टेररिस्ट असल्यासारखे चेक करून आत मध्ये सोडले जायचे ही वागणूक बरोबर नाही दादा आपल्यावर सामान्य नागरिकांच्या आशीर्वाद आहेत हे विसरून जाऊ नये व पोलीस प्रशासनाला पाठीशी घालू नये इतकेच

# वडगाव ब्रिजखाली पाणी साचल्याने वाहतूक कोंडी

पुणे : मुसळधार पावसामुळे सिंहगड रोड वाहतूक विभागाच्या हद्दीत वडगाव ब्रिजखालील ड्रेनेज व्यवस्था निकामी झाली. त्यामुळे स्वारगेट ते सिंहगड रोडमार्गे धायरी फाटा आणि नांदेड



सिटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. परिणामी काही काळ वाहतूक संथ झाली आणि वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.

दरम्यान, वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून ड्रेनेज साफसफाईचे काम केले. पोलीस अंमलदार राऊत, नेहरकर आणि सरगर यांनी समन्वय साधत पाण्याचा निचरा करून वाहतूक सुरळीत केली. त्यांच्या तत्पर कार्यामुळे मोठा वाहतूक बोजा टळला. स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या या वेळी दाखवलेल्या तत्परतेचे आणि सेवाभावाचे कौतुक केले आहे.

cmyk